# विदर्भ प्रजासत्ताक

RNI No. - MAHMAR 2023/84526

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❏ वर्ष - २ रे ❏ अंक -१७४ वा ❏ अमरावती (महाराष्ट्र) ❏ सोमवार दि.५ ऑगस्ट २०२४ ❏ संपादक - शुभांगी जोशी ❏ मुल्य - १ रु. ❏ पृष्ठ -६


## बांगलादेशच्या पंतप्रधान शेख हसीना यांचा राजीनामा देशही सोडला, हेलिकॉप्टरने अज्ञातस्थळी रवाना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५ढाका**

बांगलादेशमध्ये आरक्षणाच्या मुद्द्यावरून मोठ्या प्रमाणात हिंसाचार उफाळून आला आहे. या आंदोलनाला हिंसक वळण लागलं असून यामध्ये आतापर्यंत १०० पेक्षा जास्त लोकांचा मृत्यू झाला असल्याची माहिती समोर आली आहे. आरक्षणाच्या विरोधात सुरु असलेल्या आंदोलनाचं रूपांतर हिंसाचारात झालं. यानंतर बांगलादेशमध्ये अनिश्चित काळासाठी संचारबंदी लागू करण्यात आली. मात्र, तरीही येथील परिस्थिती नियंत्रणात आलेली नाही. यानंतर आता बांगलादेशच्या पंतप्रधान शेख हसीना यांनी पंतप्रधान पदाचा राजीनामा दिला असल्याचं वृत्त रॉयटर्सच्या हवाल्याने इंडियन एक्सप्रेसने दिलं आहे.

तसेत पंतप्रधान शेख हसीना यांनी पंतप्रधान पदाचा राजीनामा दिल्यानंतर देश सोडला असून त्या हेलिकॉप्टरने अज्ञातस्थळी रवाना झाल्याचं वृत्तही समोर येत आहे. त्या भारतात येण्याशी शक्यताही वर्तवली जात आहे. मात्र, याबाबत अद्याप अधिकृत प्रतिक्रिया समोर आलेली नाही. दरम्यान, बांगलादेशमध्ये घडलेल्या हिंसाचाराच्या घटनेनंतर तेथील लष्कर प्रमुख मोठी घोषणा करण्याची शक्यता आहे.




बांगलादेशमध्ये सुरु असलेल्या हिंसाचाराच्या घटनांवर नियंत्रण आणण्यासाठी तेथील लष्कराकडून प्रयत्न सुरु असून बांगलादेशमधील इंटरनेट सेवाही अनिश्चित काळासाठी बंद करण्यात आलेली आहे. बांगलादेशमध्ये सुरु असलेल्या हिंसाचाराच्या घटनांवर नियंत्रण आणण्यासाठी तेथील लष्कराकडून प्रयत्न सुरु आहेत. दरम्यान, गेल्या काही दिवसांपासून पंतप्रधान शेख हसीना यांच्या राजीनाम्याची मागणीही आंदोलकांकडून करण्यात येत होती. यासंदर्भात लखोंच्या संख्यांनी आंदोलकांनी ढाका शहरात मोर्चा काढला. तसेच शेख हसीना यांच्या कार्यालयावरही आंदोलक दाखल झाले होते. मात्र, परिस्थिती नियंत्रणाच्या बाहेर गेल्यामुळे शेख हसीना यांनी त्यांच्या बहिणीसह देश सोडून सुरक्षित स्थळी गेल्याचं सांगण्यात येत आहे.बांगलादेशमध्ये गेल्या काही महिन्यांपासून आरक्षणाचा मुद्दा तापलेला आहे. दरम्यान यावरून आज पंतप्रधान शेख हसीना यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यासाठी काही नागरिकांनी अहसहकार आंदोलनाची घोषणा केली होती. त्यानुसार हे नागरिक या आंदोलनात सहभागी होण्यासाठी ढाक्यातील सायन्स लॅब चौकात दाखल झाले. मात्र, यावेळी त्यांना अवामी लीग, छात्र लीग आणि जुबो लीगच्या कार्यकर्त्यांनी जोरदार विरोध केला. त्यानंतर दोन्ही गटांमध्ये जोरदार हाणामारी झाली.याशिवाय काही आंदोलनकांनी ढाक्याच्या शाहबाग भागातील बंगबंधू शेख मुजीब वैद्यकीय महाविद्यालयासह या भागातील काही कार्यालय आणि आस्थापनांवरही हल्ले केले. विशेष म्हणजे काही आंदोलक लाठ्या-काठ्या घेऊन शाहबाग चौकात जमले, तेव्हा पोलीस आणि आंदोलकांमध्ये जोरदार संघर्ष झाला. यावेळी आंदोलकांना पांगवण्यासाठी पोलिसांना अश्रूधुरांच्या नळकांड्या फोडाव्या लागल्या.

## घोटाळ्यातील पीडितांचे पैसे ईडी परत देणार मोदी सरकारचा मोठा निर्णय; ईडीची मोठी तयारी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५नवी दिल्ली**

चिटफंड, लॉटरी अशा योजनांमध्ये पैसे गमावणाऱ्यांसाठी आनंदाची बातमी आहे. असे घोटाळे समोर आल्यानंतर ईडी पैसे जप्त करत असते, आता हे पैसे पीडितांना देण्यासाठी ईडी मोठी मोठी तयारी करत आहे. ईडीने काही दिवसापूर्वी एका घोटाळ्यात कोलकातामध्ये १२ कोटी रुपये जप्त केले होते, आता ही रक्कम पीडितांना मिळणार आहे. ही रक्कम कोलकात्याच्या रोझ व्हॅली ग्रुपच्या कंपन्यांमध्ये जमा केलेल्या २२ लाख पीडितांमध्ये वितरित करणार आहे. या कंपनीने ठेवीदारांना भरघोस परतावा देण्याचे आमिष दाखवून फसवणूक केली होती.

या प्रकरणी स्थापन करण्यात आलेल्या विशेष पीएमएलए न्यायालयाने २४ जुलै रोजी



कोलकाता येथील ईडीला रोझ व्हॅली घोटाळ्यानंतर जप्त केलेली ११.९९ कोटी रुपयांची रक्कम 'सेट डिस्पोजल कमिटी'कडे हस्तांतरित करण्यास सांगितले. ईडीने कंपनीच्या १४ मालमत्ता जप्त करून ही रक्कम वसूल केली आहे. न्यायालयाने ही रक्कम पीडित ग्राहकांना देण्याबाबत सूचना दिल्या आहेत.

दरम्यान, आता न्यायालयाच्या आदेशाची ईडी अंमलबजावणी करणार आहे. न्यायालयाच्या या निर्णयामुळे आता पीडितांची रक्कम परत मिळणार आहे. लोकसभा निवडणुकीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी याबाबत आश्वासनही दिले होते. ईडी देशभरातील घोटाळे आणि घोटाळे करणाऱ्यांकडून मिळालेला पैसा जप्त पीडितांना परत देणार आहे.

**पश्चिम बंगालमधील घोटाळा काय?**

पश्चिम बंगालमध्ये २०१३ मध्ये झालेला रोझ व्हॅली घोटाळा हा मोठा आर्थिक घोटाळा आहे. हा घोटाळा शारदा घोटाळ्यापेक्षाही मोठा होता,ईडीने दिलेल्या माहितीनुसार, भारतभरातील गुंतवणूकदारांकडून १७,५२० कोटी रुपये गोळा केले. ऑल इंडिया स्मॉल डिपॉझिटर्स युनियनने ही रक्कम ४०,००० कोटी रुपये असल्याचा अंदाज व्यक्त केला आहे, तर काही अहवालांमध्ये ही रक्कम ६०,००० कोटी रुपयांपेक्षा जास्त असल्याचा अंदाज आहे.

## अरविंद केजरीवाल यांना मोठा झटका,अटक योग्य असल्याचं न्यायालयाने सांगितलं; जामीनही नाकारला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५नवी दिल्ली**

कथित मद्य घोटाळ्यात अटकेत असलेल्या मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना पुन्हा एकदा मोठा झटका बसला आहे. सीबीआयच्या खटल्यातील त्यांच्या अटकेविरोधात आणि याच प्रकरणात जामिनासाठी दाखल करण्यात आलेल्या याचिका उच्च न्यायालयाने फेटाळल्या आहेत. पण, न्यायालयाने त्यांना ट्रायल कोर्टात जामीन अर्ज दाखल करण्याची मुभा दिली आहे.न्यायमूर्ती नीना बन्सल कृष्णा यांच्या खंडपीठाने सांगितले की, केजरीवाल यांची अटक बेकायदेशीर नाही आणि सीबीआयने त्यांना कोणतेही कारण नसताना अटक केली असे म्हणता येणार नाही. ईडीच्या ताब्यात असताना केजरीवाल यांना २६ जून रोजी सीबीआयने अटक केली होती. मात्र, मनी लाँड्रिंग प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने त्यांना अंतरिम जामीन मंजूर केला आहे. केजरीवाल यांनी सीबीआय प्रकरणात अटक करून रिमांडवर पाठवण्याच्या कनिष्ठ न्यायालयाच्या निर्णयाला उच्च न्यायालयात आव्हान दिले



होते.

त्यांना २१ मार्च रोजी कथित मद्य घोटाळ्याशी संबंधित मनी लाँड्रिंग प्रकरणात अटक करण्यात आली होती. लोकसभा निवडणुकीच्या वेळी सर्वोच्च न्यायालयाने त्यांना २१ दिवसांचा अंतरिम जामीन दिला होता. ईडी आणि सीबीआयने केजरीवाल हे मद्य घोटाळ्याचे सूत्रधार असल्याचा आरोप केला आहे. पण, आम आदमी पक्ष हे आरोप फेटाळून लावत आहे. दिल्ली सरकार अस्थिर करण्यासाठी मुख्यमंत्री आणि इतर नेत्यांना खोट्या प्रकरणात अडकवण्यात आल्याचे आम आदमी पक्षाचे म्हणणे आहे.


२०२१-२२ मध्ये उत्पादन शुल्क धोरणात चुकीच्या पद्धतीने बदल करण्यात आल्याचा दावा केंद्रीय तपास यंत्रणांनी केला आहे. त्यामध्ये अशा तरतुदी करण्यात आल्या होत्या यामुळे मद्यविक्रेत्यांना अधिक फायदा झाला आणि त्या बदल्यात त्यांच्याकडून लाच घेण्यात आली. केजरीवाल यांच्याशिवाय त्यांच्या आम आदमी पक्षालाही या प्रकरणात आरोपी करण्यात आले आहे. कथित लाचेची रक्कम गोवा विधानसभा निवडणुकीच्या प्रचारासाठी वापरण्यात आल्याचा आरोप आहे.याच प्रकरणात दिल्लीचे माजी उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया हे देखील १७ महिन्यांपासून तुरुंगात आहेत. सिसोदिया यांनी जामिनासाठी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली आहे. याशिवाय पक्षाचे राज्यसभा खासदार संजय सिंह यांनाही तुरुंगात जावे लागले होते.

## श्रावण सोमवार निमित्ताने अमरावतीच्या पुरातन कोंडेश्वर मंदिरात भाविकांच्या दर्शनासाठी मोठ्या रांगा

### हर हर महादेव...! श्रावण सोमवारी हजारो भाविक भोलेनाथांच्या चरणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५बडनेरा**

अमरावती : नुकताच श्रावण महिन्याला सुरूवात झालीयं. त्यातच आज श्रावण महिन्याचा पहिला सोमवार असल्याने राज्यभरातील शिवमंदिरात भाविकांची मोठ्या प्रमाणावर गर्दी होत आहे. अमरावतीपासून १५ किलोमीटर अंतरावर असलेले पुरातन कोंडेश्वर येथील शिव मंदिरात देखील श्रावण सोमवार निमित्त्याने सकाळपासूनच भाविकांनी गर्दी केली झालीयं. रात्रीपासून



या मंदिरात शिवपिंडीच्या अभिषेकाला प्रारंभ झाला होता. त्यानंतर सकाळी पहाटेपासून भाविकांच्या दर्शनासाठी मोठ्या रांगा बघायला मिळतायं. आज दिवसभर भाविकांची गर्दी अजून वाढण्याची देखील शक्यता आहे. कोंडेश्वर मंदिर हे एक पुरातन मंदिर असल्याने श्रावण सोमवारी भाविक लांबवरून दर्शनासाठी येतात.तर तपोवनेश्वर मंदिरात देखील भाविकांनी दर्शनासाठी चांगलीच गर्दी केली होती.

**कोंडेश्वर मंदिरात शिवपिंडीच्या अभिषेकाला प्रारंभ**

कोंडेश्वर मंदिरात सकाळी ७ वाजेपर्यंत अभिषेक चालला. त्यानंतर मंदिर भाविकांसाठी खुले करण्यात आले. कोरोणाच्या दोन वर्षानंतर आता निर्बंध मुक्त झाल्याने सकाळपासूनच शिवभक्तांनी दर्शनासाठी कोंडेश्वर येथे गर्दी केली केलीयं. अकोल्यात श्रावण मासानिमित्त तीज उत्सव राणीसती धाम येथे साजरा करण्यात येत असून या उत्सवात महिलांनी येथील परिसरातील झोपाळ्यावर सावन के झुले चा मनमुराद आनंद घेतला आहे.

बारा ज्योतिर्लिंगापैकी एक असणार्या श्री क्षेत्र भीमाशंकर येथे पहिल्याच श्रावण सोमवारी सुमारे पावणे दोन लाख भाविकांनी हर हर महादेव, जंगलवस्ती भीमाशंकर महाराज की जय अशा घोषणा देत पाऊस व दाट धुक्यामध्ये पवित्र अशा शिवलिंगाचे दर्शन घेतले. यावेळी शिवलिंगावर आकर्षक फुलांची सजावट करण्यात आली होती.

## स्वबळावर लढण्याच्या दिशेने मनसेचं एक पाऊल पुढे, विधानसभा निवडणुकीसाठी दोन उमेदवारांची केली घोषणा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.५मुंबई**

लोकसभा निवडणुकीत राज्यातील सत्ताधारी महायुतीला बिनशर्त पाठिंबा देणाऱ्या मनसेने विधानसभा निवडणुकीत मात्र स्वबळावर लढण्याची तयारी सुरू केली आहे. काही दिवसांपूर्वी मनसेप्रमुख राज ठाकरे यांनी २०० ते २२५ लढवण्याची घोषणा केली होती. दरम्यान, मनसेने स्वबळावर लढण्याच्या दृष्टीने मनसेनं आणखी एक पाऊल पुढे टाकत दोन मतदारासंघातील उमेदावारांची नावं जाहीर केली आहेत.



मनसेने विधानसभा निवडणुकीसाठी स्वबळावर लढण्याची घोषणा केली असली तरी महायुतीच्या नेत्यांच्या राज ठाकरेंसोबत सुरू असलेल्या भेटीगाठींमुळे मनसे ऐनवेळी महायुतीमधून निवडणूक लढवण्याच्या निर्णय घेईल, असा दावा केला जात आहे. मात्र मनसेने आज विधानसभा निवडणुकीसाठी दोन उमेदवारांची घोषणा करत या चर्चांना पूर्णविराम देण्याचा प्रयत्न केला आहे. मनसेने पक्षाचे ज्येष्ठ नेते बाळा नांदगावकर यांना शिवडी विधानसभा मतदारसंघातून उमेदवारी दिली आहे. तर पंढरपूर विधानसभा मतदारसंघामध्ये दिलीप धोत्रे यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. या दोन उमेदवारांची घोषणा करत मनसेनं स्वबळावर लढण्याचे संकेत दिले आहेत. त्याचं कारण म्हणजे ठाकरे गटाचे विद्यमान आमदार असलेल्या शिवडी मतदारसंघावर महायुतीमधील शिवसेना शिंदे गटाचा दावा आहे. मात्र मनसेनं येथे बाळा नांदगावकर यांना उमेदवारी जाहीर केली आहे. तर पंढरपूर विधानसभा मतदारसंघामध्ये भाजपाचे समाधान अवताडे हे विद्यमान आमदार आहेत. येथेही मनसेनं दिलीप धोत्रे यांची उमेदवारी जाहीर केली आहे. त्यामुळे मनसेने हे दोन उमेदवार जाहीर करत महायुतीला योग्य ते संकेत दिले असल्याचे बोलले जात आहे.

## मानवाधिकार आयोगाच्या नावाने १५ लाखांनी गंडवले; तोतया पदाधिकाऱ्यांना अटक : भामट्यांपासून सजग राहण्याचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती**

दिल्लीस्थित आंतराष्ट्रीय मानव अधिकार परिषदेचे पदाधिकारी असल्याची बतावणी करून चांदूररेल्वे येथील संजय ननोरे यांची तब्बल १५ लाख रुपयांनी फसवणूक करण्यात आली. याप्रकरणी तोतया पदाधिकारी अनिल बन्सीलाल राठोड (रा. चांदुर रेल्वे) व संदीप दादाराव राठोड (रा. पोहरा बंदी) यांना अटक करण्यात आली आहे.

संजय ऊर्फ बाळकृष्ण ननोरे यांची चांदूर रेल्वे हद्दीतील तुळजापुर शिवारात शेती आहे. त्यांच्या जमिनीवर आवादा कंपनीने सोलर प्रोजक्ट लावले असून, त्याचा मोबदला कंपनीकडून मिळणे बाकी होते. मोबदल्यावरून ननोरे व कंपनीत काही वाद सुरू होता. त्या दरम्यान ननोरे यांची आरोपी अनिल राठोड व संदीप राठोड यांच्याशी भेट झाली. त्यांनी स्वत:ची ओळख आंतरराष्ट्रिय मानव अधिकार परिषद, दिल्लीचे पदाधिकारी असल्याचे करुन दिली. कंपनीसोबत लढणे ननोरे यांना व्यक्तीशः शक्य होणार नाही, अशी खोटी बतावणी करून त्याकरिता




त्यांचे शेत राहुल महाजन नावाच्या व्यक्तीस ७ लाख रुपयांमध्ये विक्री करण्यास भाग पाडले.

दरम्यान, कंपनीकडून तक्रारदार ननोरे यांच्या बँक खात्यात जमिनीच्या मोबदल्यापोटी २२ लाख रुपये आले असता अनिल राठोड व संदीप राठोड यांनी कंपनीकडून एकुण ३३ लाख रुपये मिळवून देतो, त्याकरिता आंतरराष्ट्रीय मानव अधिकार परिषद, दिल्लीच्या अध्यक्षांना पैसे पाठवावे लागतात, अशी खोटी बतावणी करून ननोरे यांच्याकडून १५ लाख रुपये घेऊन फसवणूक केली. आरोपींविरुध्द चांदुर रेल्वे येथे फसवणुकीचा गुन्हा नोंद करण्यात आला.

**असे आहे पोलिसांचे आवाहन**

आंतरराष्ट्रीय मानवाधिकार, राष्ट्रीय मानवाधिकार, राज्य मानवाधिकार आयोग यांचे नाव, बोधचिन्ह, खोटे ओळखपत्र, लेटरहेड याबाबींशी साधर्म्य ठेऊन काही उसम नागरिकांची फसवणूक करित असल्याचे या प्रकरणावरुन दिसून आले आहे. सबब, नागरिकांनी अशांवर विश्वास न ठेवता खोटी बतावणी करून धमकावणे किंवा एखादे प्रकरण मिटविण्याचे नावाखाली खंडणी घेण्याचा प्रकार करीत असल्यास तसेच केला असल्यास संबंधित पोलीस स्टेशनला तक्रार नोंदविण्याचे आवाहन स्थानिक गुन्हे शाखा प्रमुख किरण वानखडे यांनी केले आहे.

## राज ठाकरे ६ डिसेंबरला आंबेडकर पुण्यतिथीला शिवाजी पार्कचा बंगला सोडून लोणावळ्यात जाऊन राहतात, जितेंद्र आव्हाडांचा हल्लाबोल

राज ठाकरे हे शरद पवार यांच्यावर जातीयवादाचा आरोप करतात. पण त्यांच्या मनात जातीद्वेष आणि धर्मद्वेष किती आहे, हे त्यांच्या जवळच्या लोकांना माहिती आहे. त्यामुळे राज ठाकरे यांनी जातीपातीच्या राजकारणाबाबत बोलू नये. ६ डिसेंबरला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पुण्यतिथी असते तेव्हा राज ठाकरे त्यांचा दादरमधील बंगला सोडून लोणावळ्याला जाऊन का राहतात? हे कोणाला माहिती नाही, हे जगाला सांगावे लागेल, अशी खरमरीत टीका शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी केली. ते सोमवारी ठाण्यात प्रसारमाध्यमांशी बोलत होते.

राज ठाकरे यांनी सोमवारी सोलापूरमधील पत्रकार परिषदेत शरद पवार यांना लक्ष्य केले होते. महाराष्ट्राचा मणिपूर होऊ नये, याची काळजी शरद पवार यांनी घेतली पाहिजे, असा टोला राज ठाकरे यांनी लगावला होता. या टीकेला जितेंद्र आव्हाड यांनी प्रत्युत्तर दिले. राज ठाकरे यांनी जातीपातीच्या राजकारणाबाबत बोलू नये. त्यांनी परप्रांतीय मुसलमान आणि दलितांच्या विरोधात भूमिका घेतली. अशा माणसाने जातीपातीबद्दल बोलावे आणि ते पण शरद पवार यांच्याबद्दल, हे हास्यास्पद आहे आणि त्यांना हास्यविनोद करण्याची सवय आहे, असे आव्हाड यांनी म्हटले.

## संपादकीय ......

# सॅनिटरी नॅपकिन्सचा वापर योग्य ?

१९७४ मध्ये 'अंकुर' चित्रपटातून सिनेसृष्टीत प्रवेश केलेल्या अभिनेत्री शबाना आझमी यांच्या कारकिर्दीचे चालू वर्ष हे सुवर्ण महोत्सवी वर्ष आहे. या वर्षात 'अवनि' संस्थेच्या निमंत्रणावरून शबानाजी नुकत्याच कोल्हापुरात आल्या होत्या. कार्यक्रमाच्या आदल्या दिवशी अनुराधा भोसले यांनी शबाना यांच्याशी गप्पांचा एक छोटेखानी कार्यक्रम घेतला. यावेळी काही डॉक्टर, काही आर्किटेक्टस् आणि विविध संघटनांच्या महिला कार्यकर्त्यांची उपस्थिती होती. यावेळी लहान मुलांसाठी डायपर आणि मासिक पाळीच्या दिवसात महिला तसेच मुलींनी सॅनिटरी नॅपकिन्स वापरणे योग्य की अयोग्य ?

मासिक पाळीच्या काळात महिला व मुली रजस्रावाच्या आवश्यक व्यवस्थापनासाठी जुन्या सुती साड्यांच्या कापडाचे तुकडे करून व त्यांच्या घड्या घालून ते तुकडे वापरत; पण १९ व्या शतकाच्या अखेरीस अशा पद्धतीचा कपडा पुन्हा पुन्हा धुऊन वापरण्याने जंतुसंसर्गाची शक्यता वाढते, असे चित्र समोर आले आणि त्यावर काय उपाय करता येईल, यावर जगभर विचार सुरू झाला. लहान मुले दुपट्यात लघवी झाली की, ओल जाणवून झोपेतून जागी होतात आणि रडतात. परिणामी, आई-वडिलांची झोपमोड होते याच्यावरही काही उपाय शोधला पाहिजे, असा प्रयत्न सुरू होताच यातूनच बेबी डायपर्स, अॅडल्ट डायपर्स आणि सॅनिटरी नॅपकिन्सची कल्पना पुढे आली. पाळीच्या दिवसांतही महिलांना व मुलींना सर्व दैनंदिन कामे करण्याचे स्वातंत्र्य, लहान मुलांना आणि त्यांच्या पालकांना निर्वेधपणाने झोप मिळणे अशा अनेक फायद्यांची जाहिरात सुरू झाली. डायपर्सचा खप वाढला. मध्यंतरी तर शाळांमध्ये मुलींसाठी सॅनिटरी पॅड पुरविणारी मशिन्स बसविण्याचे प्रयोगही झाले. मुलांना रात्रभर, दिवसभर डायपरमध्ये गुंडाळणे सुरू झाले. कोणते पॅड जास्तीत जास्त काळ वापरता येऊ शकते याच्याही जाहिराती झाल्या. प्रत्यक्षात याचा आरोग्याच्या व पर्यावरणाच्या दृष्टीने फायदा होतो आहे की तोटा, यावर आता विचार सुरू झाला आहे.

खूप रक्तस्राव झाला, तरी तो पॅड शोषून घेतात अशा सॅनिटरी पॅडचा खप वाढला; परंतु अलीकडच्या काही अभ्यासांमध्ये सॅनिटरी पॅड बनवताना त्यामध्ये डायऑक्सिन, तसेच सुपर अॅबसॉर्बंट पॉलिमर यांचा आणि काही कीटकनाशके व कृत्रिम सुगंधी द्रव्ये यांचा उपयोग केला जातो. याचा दुष्परिणाम मुली व महिला यांच्या प्रजनन क्षमतेवर होणे, जननेंद्रियांचा कॅन्सर होणे यासह अनेक प्रकारचा त्रास मुली व महिलांना भोगावा लागतो असा संशय व्यक्त केला गेला आहे. लहान मुलांनाही मूत्रपिंडाचा काही विकार असेल, तर सतत डायपर घालण्याने तो लक्षात येत नाही. पॅड सुरक्षितपणे वापरायचे, तर त्यासाठी ती दिवसातून किमान तीन-चार वेळा बदलावी लागतात. मध्यम आर्थिक स्थितीतील कुटुंबांमधील मुलींना व महिलांना ही बाब आर्थिकदृष्ट्या परवडतेच असे नाही. लहान मुलांनाही डायपर खूप वेळ घालून ठेवले, तर वण उठण्यासारखे त्रास होऊ शकतात.

आणखी एक महत्त्वाचा प्रश्न म्हणजे पर्यावरणाचा! वापरात आणली जाणारी सॅनिटरी पॅड व डायपर बायोडिग्रेडेबल असतातच असे नाही. त्यांची योग्य प्रकारे विल्हेवाट लावली जात नाही. उदाहरणार्थ, सॅनिटरी पॅड कचरापेटीत टाकण्याची लाज वाटते म्हणून अनेकदा स्त्रिया पॅड शौचालयातून फ्लश करण्याचा प्रयत्न करतात. परिणामी, अनेकदा तुंबलेल्या गटारी आॅणि ड्रेनेज लाईनमध्ये मोठ्या प्रमाणावर सॅनिटरी पॅड आढळतात. शबाना आझमींच्या समवेत झालेल्या चर्चेच्या वेळी काही महिला डॉक्टरनी स्पष्ट मत नोंदवले. पूर्वी सुती साड्यांच्या घड्या पॅडप्रमाणे वापरल्या जात आणि त्यामुळे जंतुसंसर्ग होत असे, हे खरे; पण त्याचे कारण वेगळे आहे. रक्ताचे डाग असलेल्या सुती साड्यांच्या घड्या वापरानंतर बाहेर स्वच्छ उन्हात वाळत घालायला बायका लाजत. त्यातून जंतुसंसर्गाला वाव मिळे. एरव्ही मासिक पाळीच्या वेळी सुती कापडात निर्जंतुक केलेला कापूस घालून ती पॅड वापरणे चांगले. सुती कापड धुवून या कामासाठी पुन्हा पुन्हा वापरता येते. सुती कापडाच्या निर्जंतुकीकरणाबाबत सांगायचे तर कडक उन्हात सुती कापड वाळवले तरी ते चांगल्या प्रकारे निर्जंतुक होऊ शकते.

# डाळिंब पिक संरक्षणासाठी अॅन्टी हेलनेट कव्हरला मिळतंय अनुदान वाचा सविस्तर

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५अमरावती,-** गारपीट व अवकाळी पाऊस यापासून डाळिंब बागांचे संरक्षण करणे. शेतकऱ्यांना उच्च दर्जाच्या व उच्च

कृषी विशेष

प्रतीच्या निर्यातक्षम डाळिंब पिकांच्या उत्पादनासाठी आर्थिक सहाय्य करणे. फळबागांकरिता आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याकरिता शेतकऱ्यांना प्रोत्साहन देणे. ग्रामीण भागातील युवकांना कृषी क्षेत्रात स्वयंरोजगार उपलब्ध करुन देणे.

**पात्रतेचे निकष**

योजनेअंतर्गत रोपवाटीका पूर्णपणे नव्याने उभारावयाची आहे. या घटकांतर्गत यापूर्वी शासनाचा लाभ घेतलेले खाजगी रोपवाटीकाधारक, शासनाच्या लाभ न घेता उभारलेल्या खाजगी रोपवाटीकाधारक तसेच राष्ट्रीय कृषी विकास योजना, एकात्मिक फलोत्पादन अभियान, पोकरा किंवा इतर योजनेतून संरक्षित शेती (शेडनेट व हरितगृह) घटकाचा लाभ घेतलेले लाभार्थी पुनःश्च




सदर योजनेंतर्गत लाभास पात्र राहणार नाहीत.

डाळिंब हे भारतातील कोरडवाहू प्रक्षेत्रावर येणारे अतिशय महत्वाचे फळपिक आहे. त्यात महाराष्ट्र राज्य हे अग्रेसर आहे. उत्पादनात अग्रेसर असले तरी महाराष्ट्र राज्यातील डाळिंब पिकाची उत्पादकता कमी होत आहे. यातील अनेक कारणांपैकी प्रामुख्याने वातावरणीय बदल, अद्ययावत तंत्रज्ञानाचा अभाव, जमिनी व पिकाचे आरोग्य इत्यादी महत्वाची कारणे आहेत. डाळिंब उत्पादक शेतकऱ्यांना अवकाळी पाऊस, गारपीट अशा नैसर्गिक आपत्तींना सतत सामोरे जावे लागते. त्यामुळे शेतकऱ्यांना दर्जेदार व निर्यातक्षम डाळिंब पिकाचे उत्पादन घेण्यास मर्यादा येत आहेत. अवेळी पाऊस व गारपीट अशा नैसर्गिक आपत्तीपासून डाळिंब बागांच्या संरक्षणासाठी अॅन्टी हेलनेट कव्हर घटकाचा शासकीय योजनेअंतर्गत समावेश करण्याबाबत शेतकरी तसेच लोकप्रतिनिधींद्वारे सातत्याने मागणी होत आहे.

डाळिंब फळबागांचे गारपीटीपासून संरक्षणासाठी दक्षतेचा उपाय म्हणून अॅन्टी हेल नेट कव्हर एम.एस. अँगल सांगाड्यासहित या तंत्रज्ञानाबाबत महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहूरी यांच्या स्तरावर तज्ञ समितीने शिफारस केलेली आहे. अॅन्टी हेल नेट कव्हर एम.एस. अँगलच्या संरचनेवर लावल्याने गारपीट व अतिवृष्टीपासून फळे व झाडांचे संरक्षण होते. त्याअनुषंगाने राष्ट्रीय कृषी विकास योजनेअंतर्गत १०० हेक्टर क्षेत्राकरिता प्रायोगिक तत्वावर सदर घटकाची अंमलबजावणी महाराष्ट्र राज्यात करण्यात येत आहे.

**लाभार्थी निवडीचे निकष**

शेतकऱ्याने योजनेअंतर्गत अर्ज करताना त्यांच्या स्वतःच्या मालकीची जमीन असणे आवश्यक आहे.

स्वतःच्या मालकीची जमीन नसल्यास शेतकऱ्यांच्या आपसातील भाडेपट्टा करार या योजनेत ग्राह्य धरण्यात येणार नाही. तथापि शेतकऱ्याने शासकीय किंवा निमशासकीय घेतलेल्या जमिनीवर डाळिंब पिकासाठी प्लॅस्टिक कव्हर तंत्रज्ञानाचा वापर करावयाचा असल्यास दीर्घ मुदतीचा (किमान १५ वर्ष) व दुय्यम निबंधकाकडे नोंदणीकृत केलेला भाडेकरार या योजनेत ग्राह्य धरण्यात येईल

या योजनेअंतर्गत वैयक्तिक शेतकरी, शेतकऱ्यांच्या सहकारी संस्था / भागीदारी संस्था, शेतकऱ्यांच्या उत्पादक कंपन्या शासकीय, निमशासकीय व अशासकीय संस्था यांना लाभ घेता येईल. अॅन्टी हेलनेट कव्हर तंत्रज्ञानाचा वापर डाळिंब बागांसाठीच अनिवार्य राहील.

या घटकाचा लाभ घ्यावयाचा असल्यास महाडिबीटी प्रणालीवर अर्ज करणे आवश्यक राहील तसेच जिल्ह्यास दिलेल्या लक्षांकाच्या मर्यादेत सदर शेतकऱ्यांना लाभार्थी निवडीमध्ये प्राधान्य देण्यात येईल.

योजनेंतर्गत निवड होण्यापूर्वी सदर घटकाची अंमलबजावणी / उभारणी केलेला शेतकरी पात्र राहणार नाही.

# पालकमंत्र्यांनी घेतला जिल्हा नियोजन समितीचा आढावा

## ६७९ कोटी मंजूर निधीच्या कामांचे प्रस्ताव तात्काळ सादर करा- पालकमंत्री चंद्रकांत (दादा ) पाटील

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५अमरावती,-** जिल्हा नियोजन समितीअंतर्गत जिल्हा वार्षिक योजना सन २०२४-२५ मध्ये ७९ कोटींची (२० टक्के) वाढ करुन सर्वसाधारण योजनेत ४७४ कोटी निधी, अनुसूचित जाती उपयोजना १०२ कोटी व आदिवासी उपयोजनासाठी १०३ कोटी ५९ लाख असे एकूण ६७९ कोटी ५९ लाख निधी मंजूर आहे. तरी सर्व शासकीय यंत्रणांनी ३१ ऑगस्ट २०२४ पर्यंत निविदा प्रक्रिया राबवून विकास कामांचे कार्यारंभ आदेश दिले गेले पाहिजेत, असे निर्देश उच्च व तंत्र शिक्षण, वस्त्रोद्योग मंत्री तथा पालकमंत्री चंद्रकांत (दादा) पाटील यांनी आज येथे दिले.



जिल्हा नियोजन समितीची आढावा बैठक पालकमंत्री चंद्रकांत (दादा) पाटील यांच्या अध्यक्षतेखाली नियोजन भवन येथे घेण्यात आली, त्यावेळी ते बोलत होते. खासदार बळवंत वानखडे, दिव्यांग मंत्रालयाचे अध्यक्ष तथा आमदार ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू, आमदार सुलभा खोडके, आमदार रवी राणा, आमदार यशोमती ठाकूर, आमदार प्रताप अडसड, आमदार देवेंद्र भुयार यांच्यासह जिल्हाधिकारी सौरभ कटियार, पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी, महापालिका आयुक्त सचिन कलंत्री, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता मोहपात्रा, सहायक जिल्हाधिकारी पि. मिनू, पोलीस अधीक्षक विशाल आनंद, निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर, जिल्हा नियोजन अधिकारी अभिजीत मस्के तसेच विविध विभागांचे प्रमुख यावेळी उपस्थित होते.पालकमंत्री श्री. पाटील पुढे म्हणाले की, जिल्हा वार्षिक योजनांचे नियोजन करताना शाश्वत विकासाचे ध्येय, जिल्ह्याचे व्हिजन, पायाभूत सुविधांमध्ये भर देण्यावर प्राधान्य देण्यात येणार आहे. तसेच विहित कालावधीमध्ये गुणवत्तापूर्ण व दर्जेदार कामे पूर्ण करण्यासाठी सर्व कार्यान्वयीन यंत्रणांनी समन्वयाने कामे करावी. जिल्ह्यातील सर्व लोकप्रतिनिधी व नियोजन समिती सदस्यांनी मंजूर निधी अंतर्गत विविध विकासात्मक कामाचे प्रस्ताव दिनांक १० ऑगस्ट २०२४ पर्यंत प्रशासकीय यंत्रणांकडे सादर करावेत. महाराष्ट्र विधानसभा आचारसंहिता आगामी काही दिवसात लागण्याची शक्यता आहे. त्याअनुषंगाने सर्व शासकीय यंत्रणांनी मंजूर केलेल्या कामांची निविदा प्रक्रिया पूर्ण करून ३१ ऑगस्ट २०२४ पर्यंत त्या कामांचे कार्यारंभ आदेश .देण्याची कार्यवाही तातडीने करावी, अशा सूचना त्यांनी दिल्या.

जिल्हा वार्षिक योजना सन २०२४-२५ अंतर्गत कृषी व संलग्न सेवा क्षेत्र ४६.९६ कोटी, ग्राम विकास ३१.३७ कोटी, नागरी क्षेत्राचा विकास ८८.८४ कोटी, पाटबंधारे व पूर नियंत्रण १७.३२ कोटी, ऊर्जा विकास ३५ कोटी, रस्ते विकास ३८ कोटी, सामान्य शिक्षण २१.३० कोटी, आरोग्य क्षेत्र ५८ कोटी, तीर्थक्षेत्र पर्यटन व गड किल्ले २७.१८ कोटी, महिला व बाल विकास १४.१९ कोटी, व्यायामशाळा व क्रीडांगण विकास ७.६८ कोटी अशा महत्त्वाच्या क्षेत्रासाठी निधीची तरतूद करण्यात आलेली असल्याची माहिती पालकमंत्री श्री. पाटील यांनी दिली. अद्याप सन २०२३-२४ मधील मंजूर कामासाठी आवश्यक दायित्वाच्या निधीची मागणी केली नाही ती मागणी लवकरात लवकर करावी. तसेच प्रशासकीय मान्यतेसाठी आवश्यक कार्यवाही केलेली नाहीत, त्यांनी ती तातडीने पूर्ण करणे गरजेचे असल्याचे त्यांनी निर्देशित केले.

प्रारंभी जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण', 'मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना' व 'मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजना' संदर्भातील सादरीकरण केले. मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेतंर्गत जिल्ह्यात ४ लाखापेक्षा जास्त महिलांची नोंदणी झाली असून त्यापैकी १ लाख ३५ हजारापेक्षा जास्त प्रकरणांची पडताळणी झाली असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी पडताळणी झालेल्या १० लाडक्या बहिणींना पालकमंत्र्याच्या हस्ते प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले. तसेच मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेतंर्गत जिल्हाधिकारी कार्यालयात प्रशिक्षणार्थी म्हणून निवड झालेल्या ३० प्रशिक्षणार्थींना पालकमंत्र्याच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आले. त्यानंतर श्री. कटियार यांनी जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीतील विविध विषयाची माहिती सादर केली. जिल्हा वार्षिक योजना सन २०२३-२४ चा माहे मार्च २०२४ अखेर सर्वसाधारण योजना ३९५ कोटी अनुसूचित जाती उपायोजना १०२ कोटी आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजना १०३.५९ कोटी असा एकूण मंजूर निधीच्या ६००.५९ कोटीच्या अंतर्गत ६००.५६ कोटी खर्च झाल्याची माहिती देऊन खर्चाची टक्केवारी ९९.९९% इतके असल्याचे त्यांनी सांगितले.

जिल्हा नियोजनातील कामे करताना सर्व यंत्रणांनी प्रस्ताव सादर करताना कामांची निकड , लोकप्रतिनीधींनी दिलेल्या शिफारशी, सूचना तसेच सामान्य जनतेच्या मागण्यांना महत्त्व देऊन कामांचा प्राधान्यक्रम निश्चित करुन प्रस्ताव सादर करावे. आगामी काळातील आचारसंहिता विचारात घेऊन तातडीने निविदा प्रक्रिया पूर्ण करुन निधी खर्ची पडेल, असे नियोजन करण्याच्या यंत्रणांना सूचना दिल्या. तसेच जिल्ह्यातील सामान्य रुग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्र येथे रुग्णांना मुलभूत सुविधा, पावसाळात उद्भवणाऱ्या संसर्गजन्य रोगासाठी स्वतंत्र वार्ड, औषधे व मनुष्यबळासाठी आवश्यक निधी उपलब्ध करुन दिल्या जाईल. यासाठी आवश्यक बाबीचा प्रस्ताव तातडीने सादर करुन निधी उपलब्ध करुन देण्याच्या सूचना संबंधितांना यावेळी देण्यात आले.

अतिवृष्टीमुळे नाल्यांना पूरस्थिती निर्माण होऊन नाल्याकाठी असलेल्या घरांना नुकसान होण्याची शक्यता असते. त्यामुळे नाल्याना संरक्षण भिंत उभारणे आवश्यक असून यासाठी आवश्यक निधीचा प्रस्ताव तयार करावा. तसेच अतिवृष्टीच्या काळात ग्रामीण भागातील वीज पुरवठा सुरळीत राहण्यासाठी महावितरणने विशेष दक्षता बाळगावी. जिल्हा सामान्य रुग्णालय तसेच जिल्हा स्त्री रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांच्या नातेवाईकांची राहण्याची व्यवस्था निर्माण व्हावी, यासाठी आवश्यक जागा निश्चित करुन धर्मशाळेची निर्मितीचा प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश श्री. पाटील यांनी संबंधितांना दिले.

प्रारंभी जिल्हा नियोजन अधिकारी अभिजित मस्के यांनी सर्व लोकप्रतिनिधी व सर्व समिती सदस्यांचे स्वागत केले. नियोजन समितीच्या बैठकीतील विविध विषयांची माहिती त्यांनी सादर केली.




# रोज खा एक 'खजूर'! बळकट हाडं-पोलादी होईल शरीर; रक्ताभिसरण वाढेल - थकवाही होईल दूर

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५अमरावती -** निरोगी आरोग्याच्या दृष्टीने आहार आणि शरीराची हालचाल महत्वाची . काही लोक दिवसाची सुरुवात चहा आणि कॉफीने करतात. जे अत्यंत चुकीचे आहे.पण जर आपण हेल्दी पदार्थ, आणि ड्रायफ्रुट्सने दिवसाची सुरुवात कराल, तर नक्कीच याचा फायदा आरोग्याला होईल सध्या पावसाळा सुरु आहे. सुकामेव्यामध्ये खजूर खाण्याचा सल्ला मिळतो. खजूर हे फायबर, पोटॅशियम आणि लोह याने समृद्ध असतात. यातील पौष्टीक घटकांमुळे याला वंडर फूडही म्हणतात. जर आपल्याला गोड खाण्याची इच्छा होत असेल तर, आपण खजूर खाऊ शकता. यामुळे तब्येतीच्या अनेक तक्रारी दूर राहतील



**ऊर्जा आणि जीवनसत्त्वे यांचा भंडार-** क्लीव्हलँड क्लिनिकच्या अहवालानुसार, खजूरमध्ये नैसर्गिक साखर असते. जी शरीराला त्वरित ऊर्जा प्रदान करते. ज्यामुळे दिवसभर सक्रीय राहण्याची उर्जा मिळते.

खजूरमध्ये भरपूर जीवनसत्त्वे असतात. जसे की, जीवनसत्त्वे बी आणि सी. आणि खनिजे जसे की पोटॅशियम, मॅग्नेशियम आणि लोह. ज्याचा फायदा आरोग्याला पुरेपूर होतो.

**पोटाच्या आरोग्या साठी उत्तम-** खजूरमध्ये फायबर असते जे पोट निरोगी ठेवते. खजूरमध्ये पोटॅशियम असते जे हृदय निरोगी ठेवते आणि रक्तदाब नियंत्रित राहते. खजूरमध्ये अँटीऑक्सिडंट असतात. जे शरीराला विविध आजारांपासून रक्षण करतात.

**हाडांसाठी उत्तम-** खजूरमध्ये कॅल्शियम आणि मॅग्नेशियम असते. ज्यामुळे हाडे मजबूत होतात. खजूरमध्ये अँटीऑक्सिडंट असतात. जे त्वचा निरोगी आणि वृद्धत्वाची लक्षणे कमी करतात.

**रक्ताची कमतरता होते** दूर

खजूरमध्ये लोह, व्हिटॅमिन बी कॉम्प्लेक्स आणि इतर पोषक घटक असतात. ज्याचा शरीराला अनेक प्रकारे फायदा होतो. खजूरमध्ये फायबर असते जे पचन व्यवस्थित ठेवते आणि बद्धकोष्ठतेचा त्रास होत नाही.

# यंदा श्रावणी सोमवार किती ? कधी कोणती शिवामूठ वाहायची आणि त्याचे महत्त्व काय ?

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५अमरावती-** यंदा श्रावणी सोमवाराने श्रावण मासाची सुरुवात होत आहे. महादेवाला समर्पित असलेला हा महिना त्याच्याच आवडत्या वारी सुरु होत असून २ सप्टेंबर रोजी सोमवती अमावस्येच्या तिथीने पूर्ण होणार आहे. त्यामुळे यंदा चार नाही तर पाच श्रावणी सोमवार असणार आहे. या प्रत्येक सोमवारी महादेवाला मूठभर धान्य वाहण्याची प्रथा आहे. तिला आपण शिवामूठ असे म्हणतो. ती कधी, कोणती व कशी द्यायची आणि मुख्य म्हणजे का द्यायची याबद्दल सविस्तर जाणून घेऊ.

आपल्याकडे जे असेल ते भक्तिपूर्वक प्रेमाने देवाला दिले तर देव ते आनंदाने स्वीकारतो. देण्याची वृत्ती मात्र हवी. आधीच भगवान शिवशंकर भोळे, त्यात ते आशुतोष म्हणजे लहान मुलाप्रमाणे लगेच प्रसन्न होणारे! त्यात पुहा पार्वतीमातेचे पतीराज. शिव पार्वती यांच्याकडे आपण सुखी दांपत्य जीवनाचा आदर्श म्हणून पाहतो. विवाहप्रसंगीदेखील नववधू लग्नाला उभी राहण्यापूर्वी ऋगौरीहार' पूजते. त्यामुळे तो आदर्श नवविवाहितांसमोर यावा, त्यांच्या मनावर सहजीवनाचे सुसंस्कार व्हावे, यासाठी ही शिवामुठीची कल्पना व्रतानुषंगाने योजली असेल, असे मत ज्योतिर्भास्कर जयंत साळगावकर मांडतात.




पूर्वी स्त्रियां घराचा उंबरठा सहसा ओलांडण्याची संधी मिळत नसे. अशा व्रत वैकल्याच्या निमित्ताने ती संधी मिळे. आपल्या पतीसाठी, कुटुंबासाठी अशी व्रत वैकल्ये स्त्रिया आनंदाने करत. आजही करतात. त्यामुळे नेहमीचा तोचतोपणा आलेल्या आयुष्यात थोडा वेळ का होईना बदल होतो, तोदेखील त्यांना पुरेसा होतो.

आधुनिक विचारांच्या मंडळींना शिवामुठीच्या व्रतामुळे अन्नधान्याची नासाडी होण्याची चिंता वाटण्याची शक्यता आहे. परंतु पूर्वी स्त्रियांनी वाहिलेले धान्य शिवालयाच्या पुजाऱ्याला मिळत असे. त्यामुळे त्याच्या संसाराला दत होई. देण्याचा आनंद काय असतो, हे अशा व्रतामधून अनुभवता येते. दिल्याने कमी होत नाही, तर वाढ होते, मग ते ज्ञान असो नाहीतर अन्न! ही आपली भारतीय संस्कृतीची शिकवण आहे. मूठभर असले तरीही ते देता आले, याचे गृहिणींना समाधान, तर मूठ मूठ करून काही कमावले याचे घेणाऱ्याला समाधान असा दुहेरी लाभ अशा सुरेख व्रत वैकल्यांमधून होताना दिसतो. ज्यांना शिवालयात जाणे शक्य नसेल त्यांनी शिवाचे स्मरण करून ताम्हनात मूठभर धान्य बाजूला काढावे आणि नंतर त्यात भर घालून गरजूंना अर्पण करावे.अशी जुन्या-नव्या विचारांचा मेळ घालणारी आणि सर्वेपः सुखिनः सन्तु अर्थात सगळ्यांचे सुख, हित चिंतन करणारी आपली संस्कृती आहे. तिचा आदर ठेवायला हवा आणि यथाशक्ती या संस्कृती व परंपरांचा भाग होण्याचा प्रयत्न करावा.

**यंदाच्या श्रावणी सोमवारी वाहायची शिवामूठ**

| | |
|---|---|
| ५ ऑगस्ट | : तांदूळ |
| १२ ऑगस्ट | : तीळ |
| १९ ऑगस्ट | : मूग |
| २६ ऑगस्ट | : जव |
| २ सप्टेंबर | : सातू |

RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा -prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

सोमवार दि. ५ ऑगस्ट २०२४

शहर/ग्रामिण


# बेपत्ता पूजा खेडकरसाठी तपास यंत्रणांचे 'ढुंढो ढुंढो रे...';

## रसद शोधण्यासाठी अनेक शहरांवर नजर!





**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५नागपूर-** सनदी अधिकारी म्हणून अधिकृतरीत्या पदस्थ होण्यापूर्वीच चमकोगिरीच्या अट्टाहासापोटी नेम, फेम सारेच गमावून बसलेल्या आणि आता आरोपीच्या पिंजऱ्यात उभे होण्याची वेळ आलेल्या पूजा खेडकर यांना शोधून काढण्यासाठी ठिकठिकाणच्या तपास यंत्रणा कामी लागल्या आहेत.

त्यासाठी वाशिम-संभाजीनगर 'मार्गावर', संभाजीनगर 'एअरपोर्टवर' आणि आता अज्ञातस्थळी असताना पूजाला कुठून कुठून रसद पोहोचवली जात आहे, ते शोधून काढण्यासाठी तपास यंत्रणांनी अनेक शहरांवर नजर वळविली आहे.

पूजासह खेडकर कुटुंबीयातील फर्जिवाड्याचा बोभाटा झाल्यानंतर पूजाला तात्काळ मसुरीला पोहोचण्याचे आदेश मिळाले होते. त्यानंतर पूजा मसुरीला जाणार, असे सांगत वाशिममधून निघाली. त्यानंतर दोन-तीन तासात पूजा बेपत्ता झाली. ती दिल्लीला पोहोचली अन् तेथून दुबईला गेली असावी, असे बोलले जात असले तरी तपास यंत्रणांना गुंगारा देण्यासाठी तिने दुबईला जाण्याचा बनाव केला की काय, अशीही शंका शीर्षस्थ अधिकारी बोलून दाखवत आहेत. तिच्या वास्तव्याचे 'अज्ञातस्थळ' शोधून काढण्यासाठी दिल्लीसह ठिकठिकाणच्या तपास यंत्रणा पूजासोबत कनेक्ट असलेल्यांवर नजर ठेवून आहेत. पूजा वाशिम येथून संभाजीनगरकडे निघाल्यानंतर रस्त्यात तिला दुसरीच एक गाडी उपलब्ध करून देण्यात आल्याचे अधिकाऱ्यांना समजले आहे. या गाडीने ती संभाजीनगर एअरपोर्टवर पोहोचली. त्यानंतर फोन अथवा कोणत्याच दुसऱ्या साधनाने पूजा स्वत: बाहेरचा खर्च भागवू शकत नाही. अशात तिला जवळचेच कुणी मॅनेज करून देत असावे, असा निष्कर्ष अधिकाऱ्यांनी काढला आहे. हे मदत करणारे कोण, त्याचाच शोध घेण्यासाठी दिल्लीसह महाराष्ट्रातील तपास यंत्रणा राज्यातील विविध शहराकडे डोळे लावून बसल्या आहेत.

ती दिल्लीला आल्याचा संशय आहे. तेथून गायब झाल्यानंतर मात्र पूजाचा ठावठिकाणा सापडेनासा झाला आहे. त्यामुळे तिला शोधण्यासाठी तपास यंत्रणा पूजाला रसद पोहोचवणाऱ्याचा शोध घेत आहेत. पूजाला आलिशान जगण्याची सवय असल्याने आणि सद्यस्थितीत रोख, कार्ड,

### पुण्यात फिर्यादी, नगरमध्ये गुन्हा नाही

विशेष म्हणजे, एकाचवेळी अनेक आरोपांच्या वावटळीत सापडलेल्या पूजा खेडकरविरुद्ध दिल्लीत गुन्हा दाखल असला तरी महाराष्ट्रात मात्र तिच्याविरुद्ध कुठेही गुन्हा दाखल नाही. पुण्यात पूजाविरुद्ध तक्रार नाही. तर, तिने जिल्हाधिकाऱ्यांविरुद्ध तक्रार दिली आहे. त्या संबंधाने बयाण नोंदविण्यासाठी पुणे पोलिसांकडून तीन सूचनावजा नोटीस पाठविण्यात आल्या. मात्र, ती आली नाही. पुणे पोलिसांनी पूजाला व्हॉट्सपच्या माध्यमातूनही सूचना दिली. मात्र, त्या मेसेजलाही तिच्याकडून प्रतिसाद मिळाला नसल्याचे शीर्षस्थ सूत्रांनी लोकमतला सांगितले. दरम्यान, अहमदनगरच्या हॉस्पिटलमधून पूजाने बोगस दिव्यांग प्रमाणपत्र मिळवून घेतल्याचा आरोप आहे. मात्र, तशा प्रकारचा आमच्याकडे अद्याप कसलाही गुन्हा दाखल नसल्याचे नगरच्या अधिकाऱ्यांनी सांगितले आहे.

# राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय खेळाडूंबाबत शासनाचा दुजाभाव

## तीन महिन्यांतील दोन अध्यादेशात तफावत : एनआयएस प्रशिक्षकांना डावलले



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५अमरावती :** ऑलिम्पिक आले की क्रीडापटूबाबत उदार होणाऱ्या शासनाने तीन महिन्यांत काढलेल्या दोन अध्यादेशात तफावत आहे. यामध्ये राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडूंसाठी शासनाचा दुजाभाव असल्याचा आरोप क्रीडापटूं द्वारा होत आहे. शिवाय यामध्ये एनआयएस पदविकाधारकांवर अन्याय केल्याचा आरोप या खेळाडूंनी केला आहे.राज्याचे नाव उज्ज्वल केलेल्या गुणवत्ताधारक खेळाडूंना शासनसेवेत थेट नियुक्ती देण्यासंदर्भात शासनाने २९ मे २०२४ रोजी अध्यादेश जारी केला होता. यामध्ये शासनाने वरिष्ठ राष्ट्रीय स्पर्धेत सुवर्णपदक विजेत्यांना शासकीय सेवेत नोकरी देण्याचे नमूद केले आहे. ५ टक्के खेळाडू आरक्षण देताना पदाचा विचार करून या बाबी अध्यादेशात समाविष्ट करण्यात आल्या आहेत.नंतर ५ जुलै रोजी जारी करण्यात आलेल्या अध्यादेशात महाराष्ट्र राज्यातील अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंना शासनसेवेत थेट नियुक्ती देण्यासंदर्भात सुधारित धोरण जाहीर करण्यात आले. यामध्ये केवळ ऑलिम्पिक, आशियाई, वर्ल्ड, पॅरा ऑलिम्पिक जागतिक खेळाचा व अर्जुन पुरस्कारार्थीचा समावेश केला आहे.

या निर्णयामुळे राज्यातील वरिष्ठ राष्ट्रीय स्पर्धेत पदक विजेते खेळाडूंवर एकप्रकारे अन्याय केल्याची भावना निर्माण झाली आहे. अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंना अध्यादेशात स्थान देण्यात आल्याने राष्ट्रीय, अ. भा. विद्यापीठ, शिवछत्रपती पुरस्कारप्राप्त मार्गदर्शक, प्रशिक्षक खेळाडू, एनआयएस डिप्लोमाधारक प्रशिक्षक यांच्यात नाराजीचा सूर आहे.

### अन्य राज्यात खेळाडूंना संधी, महाराष्ट्रात डावलले

छत्तीसगड, बिहार, राजस्थानसह अन्य राज्यात वरिष्ठ राष्ट्रीय स्पर्धेत पदक विजेते खेळाडू व त्या राज्याचा क्रीडा पुरस्कारप्राप्त खेळाडूंना शासनसेवेत थेट सामावून घेण्याचा निर्णय झालेला आहे. महाराष्ट्रात मात्र डावलण्यात आल्याचा आरोप या खेळाडूंनी केला आहे. शिवाय नॅशनल इन्स्टिट्यूड ऑफ स्पोर्टस याभारतातील मान्यताप्राप्त खेळाडू प्रशिक्षक डिप्लोमाधारकांनाही या अध्यादेशात डावलले आहे.

राज्याचा क्रीडा पुरस्कार विजेते, वरिष्ठ राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा खेळलेले व एनआयएस डिप्लोमाधारक खेळाडूंना अध्यादेशात स्थान नाही. या अनुषंगाने अपर मुख्य सचिव (क्रीडा) यांची भेट घेतली तर ते सकारात्मक नसल्याने राज्याच्या क्रीडा धोरणाला बाधक आहे.

– **डॉ. अभिजित इंगोले,** एनआयएस प्रशिक्षक (सॉफ्टबॉल), शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार प्राप्त

# कारागृहात कैद्यांना बराकीत प्रवेशासाठी आता बायोमेट्रिक अनिवार्य

## ट्रंग स्टाईल गेटमधून होणार बंदीजनांची ये-जा; मुंबई, येरवडा, नाशिक, नागपूर, अमरावती येथे युद्धस्तरावर काम सुरू



बराकीत बायोमेट्रिक प्रणालीसाठी सर्व्हरचे काम सुरू आहे. येत्या काही दिवसातच ते पूर्ण होऊन कैद्यांना ट्रंग स्टाईल गेटमधूनच प्रवेश करावा लागेल. बंदीजनांना अन्य कोणत्याही बराकीत नो एन्ट्री असेल.

– **कीर्ती चिंतामणी,** अधीक्षक, अमरावती मध्यवर्ती कारागृह

### कंट्रोल रूममधून होणार नियंत्रण

बायोमेट्रिक प्रणालीवर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रत्येक कारागृहात कंट्रोल रूम असणार आहे. कारागृह अधीक्षकांकडे त्याचे नियंत्रण असेल. बराकीत सकाळी-सायंकाळी कैद्यांची मोजदाद, ये-जा करणे, जेवणाची वेळ, कोर्ट केस, मुलाखतीसाठी गेलेल्या बंदीजनांची संख्या एका क्लिकवर मिळणार आहे. तसेच दुपारी १२ ते ३ कैद्यांची बंदीस्त वेळसुद्धा यात अचूकपणे मिळेल.

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५अमरावती-** कारागृहा त बंदीजनांची सूर्योदय ते सूर्यास्त अशी दिनचर्या आहे. मात्र आता बंदीजनांना बराकीत प्रवेश करण्यासाठी बायोमेट्रिक अनिवार्य करण्यात आले आहे. प्रत्येक बराकीच्या मुख्य प्रवेशद्वारावर ही प्रणाली लागणार असून, गोल फिरणाऱ्या दारातून कैद्यांची 'इनकमिंग', 'आऊटगोईंग' होणार आहे. राज्यात पहिल्या टप्प्यात नऊ मध्यवर्ती कारागृहांमध्ये ही प्रणाली लागू होणार आहे. तर मुंबई, येरवडा, नाशिक, नागपूर, अमरावती येथे ही प्रणाली कार्यान्वित होण्यासाठी युद्धस्तरावर काम सुरू झाले आहे.कारागृहांत निम्म्या मनुष्यबळावर क्षमतेपेक्षा दुप्पट कैद्यांचा भार आला आहे. कैद्यांची संख्या जास्त आणि मनुष्यबळ कमी ही नित्याचीच बाब झाली आहे. त्यामुळे कारागृहांमध्ये सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. अशातच कैद्यांकडे मोबाइल, गांजा, दारू व अन्य अमली पदार्थ सापडत आहेत. परिणामी कारागृह प्रशासनाने कैदी ज्या बराकीत बंदीस्त असेल, त्याच बराकीत त्याला ये-जा करता येणार आहे. इतर कोणत्याही बराकीत बंदीजनाला प्रवेश करता येणार नाही, अशी नवी बायोमेट्रिक प्रणाली असणार आहे.

यात बंदीजनांचे डोळे स्कॅन होतील. बोटांचे ठसे घेतले जातील. त्याशिवाय कैद्यांना गोल फिरणाऱ्या दारातून (ट्रंग स्टाईल गेट) प्रवेश मिळणार नाही. या प्रणालीमुळे कोणत्या बराकीत किती कैदी बंदीस्त आहेत ही देखील आकडेवारी कारागृह अधीक्षकांना अचूकपणे कळणार आहे. राज्यात ६० कारागृहांमध्ये ही प्रणाली लागू होणार असून, पहिल्या टप्प्यात छत्रपती संभाजीनगर, नागपूर, नाशिक रोड, कोल्हापूर, येरवडा (पुणे), अमरावती, मुंबई आर्थर रोड, तळोजा व ठाणे या नऊ मध्यवर्ती कारागृहांमध्ये बायोमेट्रिक प्रणाली बसवली जात आहे.

# २० कोटींवरून बच्चू कडू-रवी राणांमध्ये जुंपली

## डीपीसी बैठकीत फिनले मिलचा वाद उफाळला



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५अमरावती –** चार वर्षांपासून बंद असलेल्या अचलपूर येथील फिनले मिलच्या पुनर्स्थापनेसाठी राज्य शासनाने २० कोटींचा निधी देण्याचे मान्य केले. या श्रेयवादावरून अचलपूरचे आमदार बच्चू कडू व बडनेराचे आमदार रवी राणा यांच्यात पुन्हा एकदा जुंपली आहे. रविवारच्या डीपीसी बैठकीत याचे पडसाद उमटले. बच्चू कडू हे आयत्या बिळावर नागोबा असल्याचा आरोप आ. राणा यांनी केला, तर राणा लोकांना किती मूर्ख बनविणार, असा पलटवार आ. कडू यांनी केला.

बैठकीत प्रारंभी आ. बच्चू कडू यांनी राज्याचे वस्त्रोद्योग मंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी अचलपूर येथील फिनले मिलला २० कोटींचा निधी उपलब्ध केल्याबाबत त्यांचा सत्कार केला. याच मुद्द्यावर बैठकीदरम्यान आ. रवी राणा यांनी ना. चंद्रकांत पाटील यांचे अभिनंदन केले. माजी खासदार नवनीत राणा व आपण स्वत: याबाबत सातत्याने पाठपुरावा केल्याचे त्यांनी सांगितले. आतापर्यंत एकाही पालकमंत्र्यांनी मिलसाठी निधी उपलब्ध केला नाही. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, ना. पाटील यांनी यासाठी दोन दिवसांपूर्वी बैठक घेतली. या मिलसाठी यापूर्वी नवनीत राणा यांनी तत्कालीन केंद्रीय मंत्री यांच्याकडे पाठपुरावा केला व बैठकी घेतल्याचे राणा म्हणाले.अचलपूर मतदारसंघात पाच वर्षांत एकही उद्योग नाही. युवकांना शिक्षणासाठी सुविधा नाही. वेगवेगळ्या जिल्ह्यांत जाऊन नेत्यांना शिव्या घालणे, मोठमोठी आश्वासने देणे, शासनाचे अनुदान हडप करणे आदी बच्चू कडू यांचे उद्योग असल्याचा आरोप आ. राणा यांनी माध्यमांशी बोलताना केला.

### राणांच्या मतदारसंघात दोन मिल बंद : आ. बच्चू कडू

आ. रवी राणांच्या बडनेरा मतदारसंघात विजय मिल, ग्रोवर्स मिल बंद आहेत. तेथील कामगार उपाशी मरत आहेत. राणा कुटुंबात एक आमदार, एक खासदार असताना काही करू शकले नाहीत. ज्या मिलसाठी आम्ही सातत्याने संघर्ष, पाठपुरावा केला, लक्षवेधी केली, तेथे वर्षभरापूर्वी २० कोटी मंजूर केले. कामगारांना ५० टक्के पगार दिला. राज्यमंत्री असताना प्रस्ताव पाठविला. खासदारपदी असताना नवनीत राणा लोकसभेत मिलसाठी चकार शब्द बोलल्या नाहीत. केंद्र सरकारच्या धोरणांचे खापर माझ्या डोक्यावर फोडण्याचा निंदनीय प्रकार आहे. काँग्रेसच्या काळात सुरू झालेली मिल भाजपच्या काळात बंद पडल्याचा आरोप आ. बच्चू कडू यांनी माध्यमांशी बोलताना केला.

# लाडकी बहीण योजनेत धामणगाव मतदार संघ अव्वल

## आ. प्रताप अडसड यांच्या प्रयत्नांना यश



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५धामणगाव रेल्वे-** मुख्यमंत्री एकनाथ शिदे यांनी महाराष्ट्रातील महिलांसाठी सुरू केलेल्या मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेत आप्रताप अडसड यांच्या प्रयत्नामुळे जिल्ह्यातील इतर तालुक्यापेक्षा धामणगाव विधानसभा मतदार संघातील तिन्ही तालुके अव्वल ठरले असून प्रशासनाकडे तिन तालुक्यात ऑनलाईन तब्बल ६५ हजार २१७ अर्ज प्राप्त झाले आहे.मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेचा लाभ सर्वसामान्य भगिनींना मिळावा,या योजनेत महिलाना पात्र होण्यासाठी येणा-या विविध समस्या त्वरित सोडवून जास्तीत जास्त महिलांना याचा फायदा कसा देता येईल यासाठी आमदार प्रताप अडसड यांनी धामणगाव रेल्वे, चांदुर रेल्वे, नांदगाव खंडेश्वर या तिन्ही तालुक्यात स्वतः युवक व युवतींचे स्वतंत्र पथक नेमले. सदर टीम तिन्ही तालुक्यात गावागावात प्रत्येक महिलांच्या घरी जाऊन निशुल्क ऑनलाईन अर्ज भरून घेत आहे आतापर्यंत धामणगाव रेल्वे, २१ हजार१९९, चांदुर रेल्वे १५ हजार २७८, नांदगाव खंडेश्वर २८ हजार ७४० अशा तीन तालुक्यात सर्वाधिक ६५ हजार २१७ ऑनलाईन अर्ज प्रशासनाला प्राप्त झाले आहे. लाडकी बहीण योजनेचे पैसे पात्रमहिलांच्या खात्यात लवकरच जमा होणार असून सध्या या प्रक्रियेने वेग घेतला आहे. आता काही निवडक महिलांच्या खात्यात प्रायोगिक तत्त्वावर तालुका प्रशासनाने एक रुपया बँक खात्यात जमा केला जात असून हा तांत्रिक प्रक्रियेचा तथा पडताळणीचा भाग यशस्वी झाला आहे

# धरणाचे गेट, गंज, वक्रद्वारांवरील दाबाची तपासणी

## जल अभ्यासक डॉ प्रवीण महाजनांच्या पत्राची दखल



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि. ५अमरावती –** मोर्शी येथील अप्पर वर्धा प्रकल्पाला ३० वर्षे पूर्ण झाली आहेत. हा मोठा प्रकल्प १९७८ साली सुरूझाला होता आणि त्याचे धरण १९९३ साली पूर्ण झाले होते. मात्र, गेल्या काही वर्षापासून या धरणाच्या सुरक्षेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. जल अभ्यासक डॉ. प्रवीण महाजन यांनी या धरणाच्या स्थितीबद्दल गंभीर चिता व्यक्त केली. त्यांनी सरकारला याबाबत त्वरित उपाययोजना करण्याची मागणी पत्राद्वारे केली होती. त्याची दखल घेऊन जलसंपदा विभागाचे धरण सुरक्षा, यांत्रिकी व स्थापत्य असे तीनही मुख्य अभियंता आणि इतर अधिकाऱ्यानी धरणावरील १२ बाय १५ गेट व त्यांचे कार्य व धरणाची इतर तपासणी केली.

जल अभ्यासक डॉ. प्रवीण महाजन यांनी या धरणाच्या स्थितीबद्दल गंभीर चिता व्यक्त करीत सरकारला पत्र दिले. त्यांच्या मते, जर वेळीच उपाययोजना केली गेली नाही तर धरण फुटण्याची शक्यता नाकारता येणार नाही. धरणाच्या वक्रद्वारांवर निर्माण झालेला दाब आणि गंज ही एक प्रमुखचिंता आहे. यामुळे स्टीफनर प्लेट्सवर दाब वाढला आहे आणि टीजी बॉक्सची क्षमता यामुळे कमी झाली आहे. पावसाळ्याच्या दिवसांत धरणाला महापूर आला तर या स्थितीत धरणाला मोठे नुकसान होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. या गंभीर मुद्द्याकडे प्रशासनाने गांभीर्य दाखवलेले नव्हते. याबाबतची माहिती एक वर्षापूर्वीच सरकार व प्रशासनाला देण्यात आली होती, परंतु त्यावर अद्याप कोणतीही ठोस कारवाई झाली नसल्याने डॉ. महाजन यांनी जलसंपदा विभागाचे अप्पर मुख्य सचिव दीपक कपूर यांना पत्र पाठविले. त्यावर शासनाचे उपसचिव न. गौ. बसेर यांनी विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ नागपूरच्या कार्यकारी संचालकांना पत्र देऊन उचित कारवाई करण्याची सूचना दिली. त्यानुसार १५ दिवसानी शुक्रवारी दुपारच्या सुमारास जलसंपदा विभागाचे मुख्य अभियंता आणि इतर अधिकारी धरण स्थळाला भेट द्यायला आले. भेट देऊन त्यांनी पाहणी केली. त्यांनी धरणावरील गेट, धरणाच्या वक्रद्वारांवर निर्माण झालेला दाब आणि गंजही पाहिला. या गेटचे डिझाइन जलसंपदाची काशी असलेल्या सीडीओच्या माध्यमातून १९८६ ला करण्यात आले होते. यानंतर या डिझाइनचा वापर बावनथडी प्रकल्पावर करण्यात आला. मुंबईच्या मध्यवैतरणा धरणातसुद्धा असल्याच गेटचा वापर करण्यात आला असल्याचे कळते. जिगांव प्रकल्पावर याच डिझाईनचेगेट उभारणीचे काम चालू असल्याचे कळते. अप्पर वर्धा धरणावर निर्णय न घेता हे अभियंते पाहणी दौरा करून परतले. आता आपापल्या कार्यालयात गेल्यावर यावर ते काय निर्णय घेतात, धरणानी वाजविलेली धोक्याची घंटा कधी बंद होईल याकडे अप्पर वर्धा धरण परिसरातील लोकांचे लक्ष लागले आहे. अप्पर वर्धा धरण परिसरातील लोक या धरणाच्या सुरक्षेबद्दल चिंतीत आहेत. सध्याचा मुसळधार पाऊस पाहता त्यांना भीती वाटते की, धरण फुटले तर... आपल्या जीवाला धोका निर्माण होईल का ?. या धरणाच्या सुरक्षेसाठी सविस्तर अभ्यास करण्याची आवश्यकता तर आहेच पण त्यांची तातडीने दुरुस्ती या नविन उभारणी, सुधारणा करणे जनतेच्या जीवासाठी महत्वाचे आहे. सरकारने त्वरित निर्णय घेत या धरणाचा आवश्यक तो जीर्णोद्धार करण्याचे काम हातीघ्यावे. अन्यथा, या धरणामुळे मोठे नुकसान होण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

# पालकमंत्र्यांच्या हस्ते रिध्दपूर येथील पोलीस चौकीचे लोकार्पण

## रिध्दपूरच्या सर्वांगिण विकासासाठी निधी उपलब्ध करुन देणार -पालकमंत्री चंद्रकांत (दादा) पाटील

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५अमरावती-** महानुभाव पंथाची काशी म्हणून रिध्दपूर सर्वदूर प्रसिध्द आहे. तसेच जगातील पहिले मराठी भाषा विद्यापीठ या ठिकाणी स्थापित होत आहे. या पार्श्वभूमीवर येथे कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीकोनातून पोलीस चौकी स्थापित होवून त्याचे लोकार्पण आज होत आहे, ही अतिशय आनंदाची व अभिनंदनाची बाब आहे. रिध्दपूरच्या सर्वांगिण विकासासाठी नागरिकांच्या मागण्यांना प्राधान्य देत सीएसआर फंड व अन्य योजनांतून निधी उपलब्ध करुन दिला जाईल, अशी ग्वाही राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण, वस्त्रोद्योग, संसदीय कार्यमंत्री तथा अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत (दादा) पाटील यांनी दिली.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या महसूल भवन येथे शिरखेड पोलीस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या रिध्दपूर येथे उभारण्यात आलेल्या पोलीस चौकीचा पालकमंत्र्यांच्या हस्ते ऑनलाईन पध्दतीने लोकार्पण करण्यात आले. त्याप्रसंगी ते बोलत होते. विशेष पोलीस महानिरीक्षक रामनाथ पोकळे, जिल्हाधिकारी सौरभ कटियार, पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी, अमरावती ग्रामीणचे पोलीस अधिक्षक विशाल आनंद, अपर पोलीस



अधिक्षक पंकज कुमावत, महापालिका आयुक्त सचिन कलंत्री, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता मोहपात्रा, निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर यांच्यासह अन्य विभागप्रमुख आदी यावेळी उपस्थित होते.

पालकमंत्री श्री. पाटील म्हणाले की, महानुभाव पंथाची काशी म्हणून ओळख असणाऱ्या रिध्दपूर हे मराठी वाङ्मयाची सुध्दा काशी आहे. या पावन भूमीत मराठीतील लिळाचरित्र आद्यग्रंथ



लिहीला गेला आहे. मराठी भाषेचा उगम याठिकाणी झाला असून जगातील पहिले मराठी भाषेचे विद्यापीठ येथे निर्माण होत आहे. जगभरातील संशोधक व अनुयायी मराठी भाषेच्या संशोधनासाठी याठिकाणी भेट देतील. या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने पोलीस चौकी स्थापन करणे हा शासनाचा मानस होता.

त्यानुसार आज याठिकाणी भाड्याच्या ईमारतीत पोलीस चौकी स्थापित होऊन त्याचे लोकार्पण आज होत आहे, त्याबद्दल जिल्हा प्रशासनाचे पालकमंत्र्यांनी अभिनंदन केले.

ते पुढे म्हणाले की, यापुढेही रिध्दपूरच्या सर्वांगिण विकासासाठी नागरिकांच्या मागणीनुसार आवश्यक सोयी-सुविधांच्या निर्मितीसाठी शासनाकडून निधी पुरविण्यात येईल. अद्ययावत पोलीस स्टेशन हे लोकांच्या संरक्षण व सुविधेची हमी असते. त्यानुषंगाने पोलीस चौकीच्या निर्मितीमुळे कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने येथील नागरिकांना आवश्यक सुविधा उपलब्ध झाली आहे. रिध्दपूर येथे आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधांबाबत मागणीचा प्रस्ताव जिल्हा प्रशासनाने शासनास सादर करावा, त्यानुषंगाने निधी उपलब्ध करुन दिला जाईल, असेही पालकमंत्री श्री. पाटील यांनी यावेळी सांगितले.

रिध्दपूर येथे पोलीस चौकी उभारण्यासंबंधी मागणी व त्यानुषंगाने पोलीस विभागाकडून करण्यात आलेली कार्यवाही याबाबत पोलीस अधिक्षक विशाल आनंद यांनी प्रास्ताविकातून माहिती यावेळी दिली.

# जिल्हा वार्षिक नियोजन योजनेचा निधी देताना पालकमंत्र्यांचा दुजाभाव

## आमदार ड.यशोमती ठाकूर यांचा आरोप

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५अमरावती-** जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्याकडून नेहमीच दुजाभाव केला जात आहे. आमच्या मतदारसंघातही लोक राहतात त्यामुळे त्यांच्या विकासासाठी निधी आवश्यक असताना तो दिला जात नाही, पहिल्यांदाच पालकमंत्र्यांनी वारंवार पाठपुरावा केल्यानंतर आता निधी द्यायचे कबूल केले आहे, हा निधी तरी मिळावा अशी अपेक्षा आमदार ॲड .यशोमती ठाकूर यांनी व्यक्त केली आहे. रेवसा गावामध्ये पूरसंरक्षण भिंतीसाठी आम्ही सातत्याने निधी मागत आहोत. मात्र पालकमंत्र्यांकडून निधी दिला जात नाही, जर काही अनुचित घटना घडली, तर त्याला पालकमंत्री जबाबदार असतील, असा इशाराही यावेळी ड. ठाकूर यांनी दिला.आम्ही पालकमंत्री असताना जिल्ह्यातील रस्त्यांसाठी ४० कोटी रुपये निधी उपलब्ध करून देत होतो मात्र आता फक्त १४ ते १५ कोटी रुपये मिळतात. वारंवार मागणी केल्यानंतर आता पहिल्यांदाच त्यांनी ३८ कोटी रुपये देतो असे सांगितले आहे आता हे पैसे मिळाले तर निश्चितच जनतेसाठी काही कामे करता येतील. मात्र डीपीडीसी ही सातत्याने होणे गरजेचे आहे. आता कितीतरी महिन्यानंतर डीपीडीसी झाली आहे.अमरावती जिल्ह्यातील आणि मतदार संघातील विकास निधीसाठी आम्ही कसा सातत्याने पुरावा करतो याचे सर्व पुरावे आमच्याकडे आहेत. कागदपत्रे आणि फाईल यांचा ढीग जमा झाला आहे. मात्र, पालकमंत्री आम्हाला नेहमी वाटाण्याचा अक्षता लावतात नेहमी आमच्याशी दुजाभाव केला जातो. आजही आम्ही आमचे मुद्दे मांडत असताना त्यांच्याच



पक्षाच्या लोकांनी बैठकीत गोंधळ घालण्याचा प्रयत्न केला. शेवटी आम्हाला जनतेचा विकासाशी मतलब असून त्या पलीकडे आम्हाला काहीही राजकारणात रस नाही. मात्र सातत्याने आम्हाला डावलले जाते, तरीही आम्ही जनतेसाठी निधी मागत राहू आणि भांडत राहू, असेही ड.ठाकूर यावेळी म्हणाल्या

# उमेदवार मागे घेण्यासाठी पैसे मागितले' आमदार रवी राणांच्या आरोपाने खळबळ



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५अमरावती :** प्रहार जनशक्ती पक्षाचे अचलपूरचे आमदार बच्चू कडू आणि बडनेराचे आमदार रवी राणा यांच्यात पुन्हा एकदा वाद उफाळून येण्याची शक्यता आहे. बच्चू कडू यांनी लोकसभा निवडणुकीत प्रहार पक्षाची उमेदवारी मागे घेण्यासाठी आपल्याला पैसे मागितले होते, असा आरोप रवी राणा यांनी केला आहे. आमदार रवी राणा म्हणाले, अचलपूर मतदार संघ भकास झाला आहे. विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाची सुविधा नाही, एकही नवीन महाविद्यालय त्यांनी आणले नाही. स्वत:च्या मतदारसंघात त्यांचे लक्ष नाही. केंद्र सरकारच्या योजनांचे अनुदान बच्चू कडू यांनी लाटले आहे. अनेक उद्योग बंद पडले. पण, त्याकडे ते लक्ष देत नाहीत. बच्चू कडू हे निवडणुकीत नेत्यांकडून पैसे घेतात. अमरावती लोकसभा मतदारसंघात प्रहार जनशक्ती पक्षाचा उमेदवार उभा करण्यात आला. नवनीत राणा यांना पराभूत करण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले, पण, त्याआधी उमेदवारी मागे घेण्यासाठी आपल्याकडे पैसे मागितले, ही काळ्या दगडावरील पांढरी रेघ आहे, असा आरोप रवी राणा यांनी केला.

# अमरावतीची 'डीपीसी' बैठक ठरली वादळी

## बैठकीत सर्वपक्षीय आमदार आक्रमक, डीपीओच्या निलंबनाचा प्रस्ताव शासनाकडे

**विदर्भ प्रजासत्ताक**



**दि.५अमरावती-** जिल्हा नियोजन समितीच्या (डीपीसी) आज, रविवारी पार पडलेल्या बैठकीत खासदार-आमदार अत्यंत आक्रमक झाले. या आक्रमकेतूनच जिल्हा नियोजन अधिकारी (डीपीओ) अभिजीत मस्के यांच्या निलंबनाची मागणी पुढे आली. दरम्यान सभाध्यक्ष या नात्याने पालकमंत्री चंद्रकांत दादा पाटील यांनी या मागणीशी सहमती दर्शवित तसा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्याचे निर्देश दिले आहेत.

एखाद्या डीपीओबाबत एवढी कठोर भूमिका घेण्याचा हा इतिहासातील पहिलाच प्रसंग आहे. त्यामुळे बैठकीतील इतर अधिकारी अवाक् झाले होते. माहिती दडवून ठेवणे, मंजूर झालेला निधी अडवणे, निधीचे असमान वितरण करणे आदी आरोप डीपीओ मस्के यांच्यावर लावण्यात आले आहेत. पालकमंत्री चंद्रकांत दादा पाटील यांच्या अध्यक्षतेखाली आज, रविवारी दुपारी जिल्हा कचेरीत डीपीसी बैठक पार पडली. या बैठकीच्या प्रारंभीच उपस्थित लोकप्रतिनिधींनी प्रश्नांची सरबत्ती करुन डीपीओच्या निलंबनाची मागणी केली.

मंचावर उपस्थित खासदार बळवंतराव वानखडे आणि उपमंत्र्यांचा दर्जा असलेले दिव्यांग कल्याण विभागाचे अध्यक्ष आमदार बच्चू कडू तसेच सभागृहात उपस्थित माजी पालकमंत्री आमदार यशोमती ठाकूर, आमदार सुलभाताई खोडके, आमदार देवेंद्र भुयार व आमदार रवि राणा यांनी हा मुद्दा लावून धरला. खोडके-ठाकूर यांनी तर थेट आत्ताच निलंबनाचे निर्देश द्या, अशी मागणी रेटली. मात्र हा या सभागृहाचा अधिकार नाही. परंतु आपल्या सर्वांच्या भावना लक्षात घेता तसा प्रस्ताव शासनाकडे पाठवावा, असे निर्देश मी देतो, असे सभाध्यक्षांनी स्पष्ट केले.

आमदार सुलभाताई खोडके यांच्या मतदारसंघातील विविध विकास कामांसाठी सुमारे ५० कोटी रुपये मंजूर झाले आहेत. हे पैसेही शासनाकडून प्राप्त झाले. परंतु १५ दिवस लोटल्यानंतरही सदर रक्कम काम करणाऱ्या यंत्रणांकडे वळती करण्यात आली नाही. त्यामुळे विकास खोळंबला, असे त्यांनी सभागृहाच्या लक्षात आणून दिले. त्यांच्यामते वारंवार संपर्क केल्यानंतरही डीपीओंकडून प्रतिसाद मिळाला नाही. शेवटी दोन दिवसांपूर्वी जिल्हाधिकारी यांच्याशी बोलणे केले. परंतु त्यांनी निर्देश दिल्यानंतरही डीपीओंनी निम्मीच रक्कम यंत्रणांकडे वळती केली. यातून त्यांचा असहकार दिसून येतो. काहीशी अशीच भूमिका खासदार बळवंतराव वानखडे व आमदार यशोमती ठाकूर, देवेंद्र भुयार यांनी व्यक्त केली. शेवटी या गंभीर बाबीची दखल घेत पालकमंत्र्यांनी वरील निर्देश दिले.

# शेतकऱ्याना कोऱ्या चेक ची मागणी करणाऱ्या बँक व्यवस्थापकवर होणार कारवाई

## आ प्रताप अडसड यांच्या मागणीवर पालकमंत्र्या चे निर्देश

## सततधार पावसामुळे पिकाच्या नुकसानाचे होणार सर्वेक्षण

**विदर्भ प्रजासत्ताक**

**धामणगाव रेल्वे दि. ५**

शेतकऱ्यांचे कामाचे दिवस असताना पीक कर्जासाठी शेतकऱ्यांना विशेषत: सेंट्रल बँक ऑफ इंडिया यांच्याकडून पाच कोरे चेक मागितले जातात या बँकेच्या शाखा व्यवस्थापकावर कारवाई चे निर्देश पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी दिले जिल्हा नियोजन समितीत रविवारी आ प्रताप अडसड यांनी शेतकऱ्याचा कर्जाच्या प्रकरणाचा विषय मांडला

शेतकऱ्यांना विविध अनुदान शासनाच्या मार्फत देण्यात येते मात्र बँकेकडून अडवणूक केले जात आहे अनेक दिवस पीक कर्जाच्या फाईल बँकेत पडून राहतात शेतकऱ्यांना वेळेवर कर्ज मिळत नाही बँक शाखा व्यवस्थापक मुद्दामपणे या कर्ज फाईल अडकून ठेवतात विशेष म्हणजे अमरावती आरसिसी कडे पाठवून अनेक दिवस कर्ज प्रकरणाची फाईल पडून राहते या विषयावर आ अडसड यांनी लक्ष वेधले

सतत पावसामुळे होणाऱ्या पीक नुकसानाचे सर्वेक्षण करून आर्थिक मदत द्यावी,३०५४-५०५४ लेखा शीर्षक पिसीआय इंडेक्स अंतर्गत कामे न घेता लोकप्रतिनिधी सुचविलेली कामे घ्यावी, भिल्ली येथे शेळीच्या गोठ्याला लागलेल्या आगीत जगदेव काळमेघ यांच्या ३८ शेळ्या जळून मृत झाल्या होत्या शेळी मेंढी विकास महामंडळाकडून शेळी मेंढी देण्यात यावी ,देवगाव साखर कारखान्या साठी शेतकऱ्यांची घेतलेली जमीन परत करण्यात यावी येथील शेतकऱ्यावर दाखल झालेले गुन्हे मागे घेण्यात यावे अशा मागण्या आ प्रताप अडसड यांनी जिल्हा नियोजन समितीत केली यावर पालकमंत्री



चंद्रकांतदादा पाटील सर्व मागणी मंजूर करीत राज्य स्तरावर साखर पुढील आठवड्यातसाखर कारखान्या साठी शेतकऱ्यांची घेतलेली जमीन परत करण्यासाठीं बैठक घेण्यात येईल भिल्ली येथील पशू पालकांना शेळी मेंढी देण्यात येईल सतत पावसामुळे होणाऱ्या पिकांचे सर्वेक्षण करण्याचे निर्देश आ प्रताप अडसड यांच्या मागणीवरून पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी दिले.-

# जिल्ह्यातील सर्व शाळांमध्ये राबविणार 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा टप्पा -२'अभियान

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५अमरावती-** मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या अभियानाच्या पहिल्या टप्प्याच्या यशानंतर राज्य शासनाने राज्यातील सर्व शाळांसाठी मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा टप्पा -२ ' राबविणे बाबत दिनांक २६ जुलै २०२४ च्या शासन निर्णयाद्वारे आदेश निर्गमित केले आहेत.सदर अभियानामध्ये दिनांक २९ जुलै २०२४ ते ४ ऑगस्ट २०२४ हा कालावधी शाळांसाठी पूर्वतयारी करीता असून दिनांक ५ ऑगस्ट २०२४ रोजी अभियानाची औपचारिक सुरुवात होणार आहे. दिनांक ५ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर हा अभियानाचा कालावधी राहणार असून ५ सप्टेंबर ते १५ सप्टेंबर २०२४ दरम्यान या अभियानांतर्गत शाळांचे मूल्यांकन होणार आहे.

अभियानाच्या पूर्वतयारी निमित्ताने विभागीय शिक्षण उपसंचालक श्री शिवलिंग पटवे यांचे अध्यक्षतेखाली विभागातील सर्व डायट प्राचार्य,शिक्षणाधिकारी



प्राथमिक,माध्यमिक,योजना तसेच सर्व गटशिक्षणाधिकारी,विस्तार अधिकारी,आणि केंद्रप्रमुख यांची एक दिवसीय कार्यशाळा दिनांक १ ऑगस्ट २०२४ रोजी सांस्कृतिक भवन अमरावती येथे पार पडली. या अभियानामध्ये शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांचाएक गट असून उर्वरित व्यवस्थापनाच्या शाळांचा दुसरा गट आहे.

दोन्ही गटातील विजयी शाळांना रोख पारितोषिके देण्यात येणार आहेत. सदर अभियानामध्ये जिल्ह्यातील १००% शाळांनी सहभाग नोंदवून हे अभियान यशस्वी करण्याचे आवाहन शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद अमरावती बुद्धभूषण सोनोने यांनी केले आहे.

# विदर्भ महारोगी सेवा मंडळ ही संस्था नसून नि:स्वार्थ सेवेचे तपोवन

## वनराईचे गिरीश गांधी यांचे प्रतिपादन

## सोमेश्वर पुसतकर लोकगौरव पुरस्कार तपोवन संस्थेला प्रदान

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५अमरावती**

विदर्भ महारोगी सेवा मंडळ ही केवळ एक संस्था नसून ते नि:स्वार्थ सेवेचे तपोवन आहे. या संस्थेच्या लोककल्याण यज्ञामध्ये अमरावतीकरांच्या सहकार्य समीधेची गरज असून आदर्श समाजसेवक सोमेश्वर पुसतकर लोकगौरव पुरस्काराने त्याचा प्रारंभ झाल्याचे मत वनराईचे विश्वस्त गिरीश गांधी यांनी व्यक्त केले.

अमरावती येथील लोक फाउंडेशन, नागपुरचे कृषि विकास प्रतिष्ठान आणि सोमेश्वर पुसतकर मित्र मंडळाच्या वतीने दरवर्षी १ लाख रुपयांचा सोमेश्वर पुसतकर लोकगौरव पुरस्कार देण्यात येतो. यावर्षी हा पुरस्कार कुष्ठरुग्णांची सेवा करणाऱ्या तपोवन संस्थेला बहाल करण्यात आला. याप्रसंगी आयोजित कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून ते बोलत होते. 'विदर्भ का राजा'फेम न्यू आझाद गणेशोत्सव मंडळाच्या प्रांगणात हा कार्यक्रम पार पडला. नामवंत लेखक व समीक्षक डॉ. अक्षयकुमार



काळे, आमदार सुलभाताई खोडके, ज्येष्ठ पत्रकार अविनाश दुधे, माजी महापौर विलास इंगोले आदी मान्यवर यावेळी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. संस्थेच्यावतीने अध्यक्ष प्राचार्य सुभाष गवई व विश्वस्तांनी हा पुरस्कार स्वीकारला. १ लाख रुपये व स्मृतिचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरुप आहे.

गांधी पुढे म्हणाले, विदर्भातील सांस्कृतिक केंद्र म्हणून अमरावती जिल्ह्याची महती असून या जिल्ह्याच्या वैभवाला कर्तृत्वाचं देणं लाभलं आहे. आजवर या जिल्ह्यातील अनेक समर्पित व्यक्तीमत्वांनी आपल्या नि:स्वार्थ कर्तृत्वातून हे वैभव अजरामर केले आहे. त्यामध्ये अशा कार्यक्रमांमुळे अधिक भर पडत आहे. समाजाने नाकारलेल्या कुष्ठरोग्यांना जवळ करुन डॉ. शिवाजीराव पटवर्धन यांनी १९४६ साली तपोवन उभे केले. दाजीसाहेबांनी दाखविलेल्या मार्गावर आजही तपोवन संस्था कार्यरत असून दाजीसाहेबांचे अनुयायी व तपोवन संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुभाष गवई व नियामक समिती सदस्यांच्या नि:स्वार्थ सेवेतून तपोवन संस्था समाजाभिमुख कार्य करीत आहे. या कार्याचा गौरव म्हणून तपोवन संस्थेला यंदाचा सोमेश्वर पुसतकर लोकगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले, हेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले. यावेळी इतर मान्यवरांचीही भाषणे झालीत.

कार्यक्रमाचे संचालन डॉ. गोविंद किरमनवार यांनी केले. आभार वैभव दलाल यांनी मानले. कार्यक्रमाला मंडळाचे अध्यक्ष दिनेश बूब, पत्रकार विलास मराठे, तपोवनच्या नियामक समितीचे सदस्य विवेक मराठे, डॉ. प्रफुल्ल कडू, ॲड.श्रीकांत खोरगडे, अविनाश भडांगे, प्राचार्य डॉ. विजय धरणे, महेंद्र भुतडा, दिलीप दाभाडे, रेवन पुसतकर, डॉ. शोभा रोकडे, पुष्पाताई बोंडे, संजय खोडके, डॉ. गोविंद कासट यांच्यासह समाजातील प्रतिष्ठीत नागरीक उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांना पुराच्या पाण्यातून काढावा लागतो जिवघेणा मार्ग

## नदीवर पूल नाही, पावसाळ्यात बेलगंगा वाहते दुथडी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अंजनगाव सुर्जी**

अंजनगाव सुर्जी तालुक्यातील चौसाळा येथे शिक्षण घेणाऱ्या आजूबाजूच्या गावातील विद्यार्थ्यांना वर्षानुवर्षे दुथडी भरून वाहणाऱ्या बेलगंगा नदीच्या पुरातून मार्ग काढवा लागत आहे. हा प्रकार जिवावर बेतणारा ठरू शकतो. भरपावसाळ्यात वाहतुकीचा खोळंबा होऊन जनजीवन ठप्प होते. या नदीवर पुलाची मागणी कैक वर्षांपासून नागरिक करीत आहेत.

चौसाळा येथील श्रीमती शेवंताबाई काळमेघ विद्यालय हे या परिसरात एकमेव नामांकित विद्यालय आहे. निमखेड बाजार, हिरापूर, खिराडा, चिंचोना, सावरपाणी, खिरपाणी या गावातील विद्यार्थी येथे येतात. त्यांना चौसाळा ते निमखेड बाजार मार्गाने बेलगंगा नदीपात्रातून वाट काढावी लागते. पूल नसल्यामुळे विद्यार्थ्यांना पावसाळ्यात पुरातूनच ये-जा करावी लागते. गेल्या चार-पाच दिवसांपासून बेलगंगावरील सावरपाणी येथील धरण भरल्याने नदीला पूर आहे. जवळपास या पाण्यातून विद्यार्थी शिक्षणासाठी आपला जीव धोक्यात घालत आहेत.



### एकीकडे पूर, दुसरीकडे काटेरी झुडपे

चौसाळा ते निमखेड बाजार मार्ग खड्डेमय झाला आहे. या मार्गाच्या दोन्ही कडांवरील काट्यांची झुडपे आहेत. नागरिकांना या काटेरी झुडपांचे फटके खातच मार्गक्रमण करावे लागते. दरवर्षी पावसाळ्यात नदीला पूर आल्यावर विद्यार्थ्यांना त्यातून मार्ग काढून शाळा गाठावी लागते. चौसाळा निमखेड बाजार रस्त्याची अतिशय दयनीय अवस्था झाली आहे. लोकप्रतिनिधींनी हा प्रश्न मार्गी लावावा.

**– विजय तिजारे, निमखेड बाजार**

मी नवीनच रुजू झाल्यामुळे लवकरच प्राथमिकदृष्ट्या काय उपाययोजना करता येतील, त्या मी स्वतः पाहणी करून सोडवण्याचा प्रयत्न करणार आहे.

**– तेजस तंबाखे, उपकार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम विभाग, दर्यापूर**

# ओबीसींच्या उपवर्गीकरणाचा मराठा समाजालाही फायदा होणार

## पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांचे मोठे विधान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती**

सर्वोच्च न्यायालयाने अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती यामध्ये अ, ब, क आणि ड असे गट पाडून त्यांना आरक्षणाचा लाभ देण्यासंदर्भात निर्णय दिला. यावर राज्याचे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री तथा अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी म्हटले, चाळीस-पन्नास जातींमध्ये स्पर्धा करण्याऐवजी आर्थिक परिस्थितीनुसार प्रत्येकाच्या खिशात जे काही साडेआठ ते दहा टक्के आरक्षण मिळते. त्याचा लाभ प्रत्येकाने घ्यावा. हे सर्वांच्या फायद्याचे राहणार आहे. ओबीसींच्या आरक्षणाचे देखील उपवर्गीकरण केल्यास त्याचा मराठा समाजालाही फायदा होऊ शकतो, असेही पाटील म्हणाले.



अमरावतीचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील हे रविवारी अमरावती दौऱ्यावर आले होते. नियोजन समितीची बैठक संपल्यानंतर माध्यमांना प्रतिक्रिया देताना ते बोलत होते. राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले, ओबीसीमध्येदेखील गट पडावे यासाठी केंद्र शासनाने रोहिणी कमिशन गठीत केले होते. या कमिशनच्या अहवालानुसार ओबीसी मध्ये अ, ब, क, ड असे गट पाडले तर यामध्ये कुणबी सह आणखी ५० जाती असतील. यामुळे प्रत्येक जातीला चार साडेचार टक्के आरक्षण मिळू शकते.

**मनोज जरांगे पाटलांनी ऑन टेबल बसावे**

माध्यमांशी बोलताना ते म्हणाले, ओबीसीमध्ये अ, ब, क, ड गट पाडले तर सर्वांना कसा लाभ मिळेल ? हे व्यवस्थित समजून घेण्यासाठी मनोज जरांगे पाटील यांनी ऑन टेबल बसायला हवे. आपले भले कशात आहे?, कोर्टात काय टिकेल ? घटनेच्या चौकटीत काय बसेल? याचा विचार करायला हवा. जरांगे पाटील यांना याबाबत काही शंका असेल तर त्यांनी आपले चार वकील घेऊन यावे. मी एकटाच याबाबत मुद्दे मांडायला तयार आहे. २०१४ ते २०१९ दरम्यान मराठा आरक्षण उपसमितीचा मी अध्यक्ष होतो.आता देखील उपसमितीचा अध्यक्ष आहे. मला वकिलाची गरज नाही. मात्र जरांगे पाटील यांनी त्यांचे तज्ञ वकील आणावेत. या सर्व विषयांवर योग्य मार्ग काढावा, असे आवाहन देखील पाटील यांनी केले.

**एकमेकांचा आदर करावा**

फ्रेंडशिप डे च्या निमित्ताने कोणी कोणत्याही पक्षाचा असो त्याची कुठलीही विचारधारा असो मात्र त्यांनी एकमेकांचा आदर करावा, मैत्रीपूर्वक संबंध जपावे, असा संदेश चंद्रकांत पाटील यांनी माध्यमांशी बोलताना दिला.

# शहराचे आरोग्य राखण्याची जबाबदारी स्वच्छता निरीक्षकांची: भूषण पुसदकर

**विदर्भ प्रजासत्ताक दि.५अमरावती**

नगरपालिका आणि महानगरपालिकेमध्ये स्वच्छता निरीक्षकांचे काम सगळ्यात कठीण असते. याचे कारण शहराची स्वच्छता हा नगर प्रशासनातील सर्वात महत्त्वाचा विषय असून स्वच्छता निरीक्षकांची जबाबदारी मोठी असते, असे उद्गार अमरावती महानगरपालिकेचे सहाय्यक आयुक्त भूषण पुसदकर यांनी व्यक्त केले.अमरावती येथील अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेच्या अमरावती



उपकेंद्रावर रविवारी न्यू हायस्कूल बेलपुराच्या सभागृहामध्ये स्वच्छता निरीक्षक अभ्यासक्रमाच्या रेग्युलर व हॉलिडे अशा दोन्ही बॅचचे उद्घाटन आयोजित भूषण पुसदकर यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. पुरुषोत्तम दाळू, माजी प्राचार्य कुटुंब कल्याण व आरोग्य प्रशिक्षण केंद्र अमरावती होते तर प्रमुख अतिथी म्हणून अमरावती महानगरपालिकेचे राजापेठ झोनचे सहाय्यक आयुक्त भूषण पुसदकर व वरिष्ठ स्वच्छता निरीक्षक, संस्थेचे माजी विद्यार्थी राजेश राठोड, अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेचे विभागीय संचालक जयंत पाठक हे उपस्थित होते.

सर्व जबाबदाऱ्या नीट पार पाडता येतील असे कौशल्य सर्व विद्यार्थ्यांनी शिकून घ्यावे. कामाला समजून घेण्यासाठी अमरावती महानगरपालिका या अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना नेहमीच मदत करेल असे आश्वासन भूषण पुसदकर यांनी दिले.

कार्यक्रमाला अमरावती महानगरपालिकेचे वरिष्ठ स्वच्छता निरीक्षक राजेश राठोर, माजी आरोग्य संचालक डॉ. पुष्पा थोरात, डॉ. शामसुंदर निकम, डॉ. दिलीप निकोसे, एस डी वडनेरकर, प्रफुल्ल नीमकर, अनिता तेलंग, डॉ. प्रज्ञा बनसोड तसेच, उपस्थित होते.

# अल्पभूधारक शेतकऱ्याचा मुलगा झाला सी. ए.; भाजपचा वतीने करण्यात आला आई वाडीलासह मुलाचा सत्कार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती**

चांदूर बाजार तालुक्यांतील दहीगाव पूर्णा या छोट्याश्या गावातील अत्यंत अल्पभूधारक शेतकरी असलेल्या गरिब कुटुंबातील मुलगा हा सी.ए. ची परिक्षा उतिर्ण होवून त्याने आई वडिलाचे व गावकऱ्यांचे स्वप्न केले पूर्ण. भारतीय जाणता पार्टी पंचायतराज व ग्रामविकास विभाग अमरावती जिल्हा ग्रामीण च्या वतीने गावकऱ्यांच्या उपस्थितीत पारिसे कुटुंबाचा सत्कार करण्यात आला.



दहिगाव पूर्णा या गावातील अत्यंत अल्पभूधारक भोई समाजाचे सुखदेव परिसे यांनी शेती काम करून तसेच त्यांच्या पत्नीने शिवणकाम करून आपल्या किरण नावाच्या मुलाला अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत शिक्षण दिले. आपल्या कुटुंबाच्या गरिबीच्या परिस्थितीची आणि आई वडिलांच्या मेहनतीची जाण ठेवून किरणने खूप मेहनत करून सी . ए. ची परीक्षा उतीर्ण करून कुटुंबाचे आणि गावकऱ्यांचे स्वप्न पूर्ण केले. एक लहानशा गावात राहणाऱ्या भोई समाजात जन्मलेल्या किरणने जे यश प्राप्त केले ते प्रशंसनीय असल्याने भारतीय जनता पार्टी पंचायतराज व ग्रामविकास विभाग अमरावती ग्रामीण चे जिल्हा संयोजक गोपाल तिरमारे यांनी गावचे सरपंच राजीव वैद्य यांच्या उपस्थितीत किरण आणि त्याचे आई वडील यांचा शाल श्रीफळ देवून सत्कार केला. यावेळी गावातील प्रतिष्ठित व्यक्ती देवेंद्र वैद्य, गजानन पारीसे,नरेश झवर, गजानन कडू, एकनाथ पारीसे, वसुदेव पारीसे, सुखदेव पारीसे, भीमराव पारीसे, निलेश पुसतकर शेतकरी किरण सुखदेव पारीसे, भाजपचे सुमित निंभोरकर, राजू तंतरपाडे, वैभव तिखीले, प्रवीण खैरकर, तेजस आजणकर तसेच अनेक गावकरी हजर होते.

# पं. प्रसाद खापर्डे यांचा 'स्वरमल्हार' ११ ऑगस्टला

## अमरावतीकरांसाठी शास्त्रीय उपशास्त्रीय संगीताची मेजवानी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती**

सुप्रसिद्ध हिंदुस्थानी शास्त्रीय गायक पं. प्रसाद खापर्डे (नाशिक) यांच्या शास्त्रीय आणि उपशास्त्रीय गायनाच्या 'स्वरमल्हार' या कार्यक्रमाचे आयोजन रविवारी (ता.११) संध्याकाळी ५.३० वाजता संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन येथे करण्यात आले आहे.



अमरावती शहरातील जाणकार संगीत रसिकांसाठी ही सांगीतिक मेजवानी गुरुकुल संगीत अकादमीद्वारा प्रस्तुत केली जाणार असून मैफिलीच्या आयोजनासाठी नगरसेवक तुषार भारतीय आणि मित्रमंडळ यांनी पुढाकार घेतला आहे. यावेळी तबल्यावर मयंक बेडेकर, संवादिनीवर श्रीकांत पिसे आणि सारंगीवर उस्ताद फारुख लतिफ खान संगत करणार असून मैफलीचे निवेदन सुप्रसिद्ध निवेदक नितीन भट करणार आहेत. कार्यक्रमाचे प्रायोजक नगरसेवक तुषार भारतीय असून सहप्रयोजक अजमेरा टायर्स, बॅटरी अँड ऑइल आणि कार्पेट टच आहेत.

विदर्भाचे सुपुत्र असलेले पं. प्रसाद खापर्डे हे भारतीय खयाल गायकीसाठी प्रसिद्ध असलेल्या रामपूर सहसवान घराण्याचे गायक असून सुप्रसिद्ध शास्त्रीय गायक पद्मश्री उस्ताद राशीद खान यांचे शिष्य आहेत. रसिकांसाठी हा कार्यक्रम निःशुल्क आहे. भारदस्त आणि मधुर आवाजाची देणगी लाभलेल्या पं. प्रसाद खापर्डे यांच्या मैफलीचा आस्वाद घेण्याचे आवाहन गुरुकुल संगीत अकादमीचे तुषार भारतीय आणि मोहन भिवरकर यांनी केले आहे.

# लाचखोरीत अमरावती विभाग राज्यात चौथ्यास्थानी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती**

शासकीय कामांमध्ये लाचेची मागणी होण्याचे प्रमाण चांगलेच वाढले आहे. शासकीय कामांना लाचेची कीड अक्षरशः लाचेची कीड लागली आहे. पैसे दिल्याशिवाय काम होत नसल्याचे चित्र निर्माण झाले. अमरावती विभागात येणाऱ्या पाच जिल्ह्यांमध्ये २०२४ या वर्षामध्ये लाचखोरीचे तब्बल ५० प्रकरणे दाखल झाले आहेत. या प्रकरणांमध्ये ७० लाचखोर अधिकारी, कर्मचारी व खासगी व्यक्ती अडकले आहेत. राज्यात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या राज्यात आठ परिक्षेत्रामध्ये अमरावती विभाग कारवाईच्या संख्येमध्ये चौथ्यास्थानी आहे. लाचखोरांवर कारवाई करण्यात नाशिक परिक्षेत्र आघाडीवर आहे. दुसऱ्या क्रमांकावर पुणे, तर तिसऱ्या क्रमांकावर छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्राचा क्रमांक लागतो. राज्यात लाच मागण्याच्या प्रकरणांमध्ये सातत्याने वाढ होतांना दिसत आहे. अमरावती विभागही त्यात मागे नाही. २०२४ या वर्षामध्ये १ ऑगस्टपर्यंत लाच प्रकरणाचे ४९ गुन्हे दाखल झाले आहेत. ६९ आरोपींचा समावेश आहे. त्यानंतर २ ऑगस्टला वाशिम येथे व्यापारी संकुलातील दुकानाच्या नोंदणीकृत भाडेपट्ट्यासाठी तब्बल सात हजारांची लाच स्वीकारणाऱ्या सहाय्यक मिळकत व्यवस्थापकाला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने



रंगेहात पकडून गुन्ह्याची पन्नाशी पूर्ण केली. यात एक आरोपी गजाआड आल्याने आतापर्यंत एकूण ७० आरोपी अडकले आहेत. हे सर्व गुन्हे लाच घेतांना सापळा रचल्याचे आहेत. लाचखोर प्रकरणाचे विभागातील सर्वाधिक गुन्हे अमरावती जिल्ह्यात घडले. अमरावती जिल्ह्यात १५ गुन्हे दाखल झाले आहेत. अकोला जिल्ह्यात आठ, यवतमाळ जिल्ह्यात ११, बुलढाणा जिल्ह्यात १० व वाशिम जिल्ह्यात सहा गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. एकूण ५० गुन्ह्यांसाठी ७० आरोपींना पकडण्यात आले. गेल्या वर्षी याच काळात ५२ सापळे रचण्यात आले होते. या वर्षात अपसंपदा व अन्य भ्रष्टाचाराचा एकही गुन्हा अमरावती परिक्षेत्रात दाखल झालेला नाही. शासकीय कामात लाचेची मागणी झाल्यास तक्रार करण्याकडे नागरिकांचा कल कमीच असल्याचे दिसून येते.

# माझ्या पराभवासाठी आ. राजकुमार पटेल यांनी सुपारी घेतली

## भाषण करतांना नवनीत राणा यांना अश्रू अनावर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. ५ धारणी**

लोकसभा निवडणुकीच्या पराभवानंतर आज माजी खा. नवनीत राणा पहिल्यांदा मेळघाट दौऱ्यावर आहेत. मतदारांचे आभार व्यक्त करण्याकरिता त्यांनी धारणी येथे आभार सभा घेतली. यावेळी भाषण करतांना नवनीत राणा यांना अश्रू अनावर झाले. खासदार असतांना पाच वर्षे पूर्ण प्रामाणिकपणे काम करूनही जेव्हा मेरिटचा विद्यार्थी नापास होते. तेव्हा खूप त्रास होतो असेही नवनीत राणा म्हणाल्या. यावेळी नवनीत राणा यांनी धारणी विधानसभा मतदार संघाचे आमदार राजकुमार पटेल यांच्यावर जोरदार टीका केली. लोकसभा निवडणुकीत माझ्या विरोधात खोटा प्रचार करण्यात आला. राजकुमार पटेल हे बेईमान आहेत. आदिवासीं सोबत अन्याय व त्यांचे रक्त पिण्याचे काम राजकुमार पटेल करीत आहे. माझ्या पराभवासाठी राजकुमार पटेल यांनी सुपारी घेतली, पैसे घेऊन माझ्या विरोधात त्यांनी काम केलं असल्याचा खळबळजनक आरोपही नवनीत राणा यांनी केला.

# कंत्राटी शिक्षक भरतीसाठी योग्य उमेदवारांना संधी मिळावी, मेळघाटातील स्थानिक युवांची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५ मेळघाट**

अमरावती जिल्ह्यातील मेळघाट क्षेत्रात शिक्षण क्षेत्रातील भरती प्रक्रियेबाबत मोठा असंतोष व्यक्त करण्यात येत आहे. या क्षेत्रातील धारणी व चिखलदरा तालुक्यात अनेक उमेदवार ऊएव आणि इ.एव सारख्या आवश्यक शिक्षण घेऊन योग्यतापरीक्षा उत्तीर्ण झाले आहेत. तथापि, जिल्हा परिषद शिक्षक कंत्राटी भरती २०२४ अंतर्गत फक्त पेन्शन धारक सेवानिवृत्त शिक्षकांना नोकरीच्या संधी मिळत आहेत, जे स्थानिक बेरोजगार युवकांच्या कामगार संधींना अडथळा ठरते आहे.

स्थानिक आदिवासी, बलई, गवळी आणि इतर समाजातील युवकांनी याविरोधात आवाज उठवला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, या क्षेत्रातील स्थानिक पात्र उमेदवारांना प्राथमिकता देण्यात यावी, अन्यथा स्थानिक बेरोजगारीच्या समस्येला



सामोरे जावे लागेल. या संदर्भात त्यांनी स्थानिक प्रशासनाकडे, शिक्षण विभागाकडे आणि संबंधित अधिकाऱ्यांकडे मागणी केली आहे की, मेळघाटातील स्थानिक युवकांना योग्य संधी प्रदान करण्यात यावी.

स्थानिक उमेदवारांच्या हक्कांसाठी व बेरोजगारीच्या समस्येच्या निराकरणासाठी ही मागणी अत्यंत महत्वाची आहे. संबंधित अधिकार्यांनी यावर त्वरित विचार करून उचित निर्णय घेणे अपेक्षित आहे.

मेळघाट मध्ये नियमित स्वरूपाच्या शिक्षक भरती होई पर्यंत पेन्शन किव्हा सारख्या योजनांच्या लाभ घेणाऱ्या सेवानिवृत्त शिक्षकांचं नियुक्तीचा विरोधात स्थानिक क्षेत्रातील सर्वच युवक आहे. मेळघाटात शेकडो पात्रताधारक उमेदवार असल्यामुळे व भरती कंत्राटी स्वरूपाची असल्याने मेळघाटातीलच स्थानिक आदिवासी, बलई, गवळी व इतर समाजातील उमेदवारांना संधी देऊन युवकांना उदरनिर्वाहाचा साधन उपलब्ध करून द्यावे..

**राकेश र अथोटे, पात्रताधारक, मेळघाट**

# राज ठाकरेंवर टाडा लागला पाहिजे, त्यांना तुरुंगात टाकलं पाहिजे; प्रकाश आंबेडकर कडाडले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५ अमरावती**

शासनाचा निधी हा परप्रांतीय नागरिकांवर खर्च होत आहे असा आरोप मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी केला होता. त्यावर वंचीत बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर म्हणाले, अशा लोकांवर ताडा कोर्ट लागला पाहिजे. त्यांना कारागृहात टाकून मोकळं व्हायला पाहिजे. ते अमरावतीत माध्यमांशी बोलत होते.




प्रकाश आंबेडकर म्हणाले, महाराष्ट्रातला माणूस यूपीमध्ये आहे. ओडिशामध्ये आहे. महाराष्ट्रातील माणूस पश्चिम बंगालमध्ये आहे. मध्यप्रदेशात आहे. गुजरातमध्ये सुद्धा आहे त्यांचं काय करायचं? समाज दुभंगण्याची ही वक्तव्य आहेत, समाज दुभंगला की देश दुभंगतो. युएपीए आणि नॅशनल सिक्युरिटी क्ट यांच्यावर लागला पाहिजे. सरकारने हिंमत दाखवावी.

ओबीसी हा मराठ्याला आणि मराठा ओबीसीला मतदान करणार नाही. आपलं आरक्षण जातंय, याची जाणीव झालेली आहे. मराठवाड्यातून विदर्भात आलो तेव्हा पहिली बैठक ओबीसीसोबत झाली विदर्भातला कुणबी हा ओबीसी आहे. पण ऐणीची वेळ आली तर हा कोणासोबत असेल? असा सवाल प्रकाश आंबेडकरांनी उपस्थित केला आहे. तसेच बच्चू कडू तिसऱ्या आघाडीच्या तयारीत आहे यावर प्रकाश आंबेडकर म्हणाले की, ज्याचं काही अस्तित्व नाही त्यावर मी कमेंट करणार नाही.प्रकाश आंबेडकर पुढे म्हणाले, आरक्षण बचाव यात्रा सुरू केली. याला यश मिळालं आहे. जरांगे पाटील यांची जी मागणी आहे, मराठ्यांना ओबीसीमधून आरक्षण द्या यात दोन गट पडले .एक मराठा आणि दुसरा ओबीसी... मात्र काही जणांचे मनसुबे या यात्रेतून ते उध्वस्त झाले आहेत

**खरी शिवसेना ही एकनाथ शिंदेची : प्रकाश आंबेडकर**

जी शिवसेनेची मत आहे ती एकनाथ शिंदे सोबत राहील. खरी शिवसेना ही एकनाथ शिंदेची आहे कारण उद्धव ठाकरे यांचा स्ट्राईक रेट हा मुस्लिम समाजामुळे वर आला आहे, असे देखील प्रकाश आंबेडकर म्हणाले.

# अप्परवर्धा धरणाची तीन दारे २० सेमी नी उघडली

## ९४ घन सेंटीमीटर एवढा पाण्याचा विसर्ग सुरू



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५ अमरावती**

ऊर्ध्व वर्धा धरणाच्या पाणलोट क्षेत्रात शनिवारपासून सुरू असलेल्या संततधर पावसामुळे धरणाच्या जलसाठ्यात मोठ्या प्रमाणात वाढ होत असून नदीचे पाण्याच्या पातळीमध्ये आणखी वाढ होण्याची शक्यता बघता व अपेक्षित पर्जन्यमानाचा विचार करता जलाशय प्रचलन सूचीप्रमाणे आज शनिवार५ ऑगस्टला दुपारी १२ वाजता ऊर्ध्व वर्धा धरणाची १३ पैकी तीन वक्रद्वारे २० सेंटीमीटरने उघडण्यात आले असून त्यामधून ९४ घन सेंटीमीटर एवढा पाण्याचा विसर्ग नदीपात्रात सोडण्यात येत आहे.वर्धा नदी काठावरच्या गावातील ग्रामस्थांना तसेच मासेमाऱ्यांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला असून याबाबत ऊर्ध्व वर्धा धरण विभागाच्या वतीने जिल्हाधिकारी अमरावती, वर्धा, यवतमाळ, चंद्रपूर यांना एक पत्र देण्यात आले आहे.

ऊर्ध्व वर्धा धरणाच्या पाण्याचे तुषार अंगावर घेण्यासाठी मोठ्या प्रमाणात गर्दी करणार आहे. धरणाची जलपातळी जुलै अखेरपर्यंत ७४ टक्क्यांच्या खाली होती मात्र आता ४ ऑगस्टला पाण्याच्या साठ्याची टक्केवारी ७७.२ एवढी झाल्याने धरणाची दारे उघडण्याची वेळ आलेली आहे.ऊर्ध्व वर्धा धरणाची निर्धारित पाण्याची पातळी ३४२.५० मिलिमीटर एवढी ठेवण्यात आली असून सध्या ही पातळी ३४०.९७ मिलिमीटर झाली आहे. जवळपास ७७.२ टक्के धरण भरलेले आहे. अप्पर वर्धा धरणाच्या पाणलोट क्षेत्रात पाऊस कोसळत आहे. मध्यप्रदेशातून वाहत येणारी जामनदी व माडु नदी तुडुंब भरून वाहत असल्यामुळे धरणाच्या जलसाठ्यात प्रचंड वाढ झाली आहे. त्यामुळे ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यातच धरणाची तीन दारे उघडण्याची वेळ आलेली आहे.

# सरकारकडून महत्त्वाचा आदेश जारी; बालविवाह रोखण्याची जबाबदारी ग्रामपंचायतींकडे

**विदर्भ प्रजासत्ताक दि.५मुंबई**

बालविवाह रोखण्याची जबाबदारी कर्नाटक सरकारने ग्राम पंचायतींकडे सोपवली आहे. त्याबाबत आदेश देखील बजावण्यात आला असला तरी त्यावर अद्याप कार्यवाही मात्र झालेली नाही. बालविवाह रोखण्याच्या दृष्टिकोनातून ग्रामपंचायतीने एकही मोहीम अजून हाती घेतलेली नाही.

बालविवाहाची प्रथा आजही ग्रामीण भागात कायम आहे. महिला आणि बालकल्याण खातं तसंच पोलीस दलाच्या



माध्यमातून बालविवाह प्रथांना रोखलं जातं. ग्रामीण भागात हा प्रकार अधिक घडत असल्याने सरकारने ग्रामपंचायतींकडे देखील ही महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपवली होती. परंतु, बालविवाह रोखण्याच्या दृष्टीने ग्रामपंचायतीने अद्याप कोणतेही काम केलेले नाही.

सरकारचा आदेश केवळ कागदोपत्रीच राहिला आहे. सरकारच्या चांगल्या योजना आणि निर्णय तळागाळापर्यंत पोहोचावेत, यासाठी ग्रामपंचायतींना अधिक अधिकार दिले जात आहेत. त्याचाच एक भाग म्हणून बालविवाह प्रतिबंधक कायदा अंमलबजावणीचे अधिकार देखील ग्रामपंचायतींना नुकतेच बहाल करण्यात आले आहेत. परंतु, त्याचा वापर मात्र ग्रामपंचायतीकडून झालेला नाही.ग्रामपंचायतीने या अधिकारांचा वापर न केल्यास संबंधित पंचायत विकास अधिकाऱ्यांवर तसंच, ग्रामपंचायतीवर कारवाई करण्याचा अधिकार देखील ग्रामीण विकास आणि पंचायत राज खात्याकडे आहे. परंतु, तरी देखील या आदेशाची कठोर अंमलबजावणी मात्र ग्रामपंचायत पातळीवर होताना दिसत नाही. ग्रामीण भागातील जनतेमध्ये जागृती करणं आणि गाव पातळीवर बालविवाह रोखण्यासाठी उपाययोजना राबवण्याची गरज आहे.

# अमरावतीकर रॅपर आर्या जाधव मराठी बिग बॉसमध्ये

## पाचव्या पर्वातील स्पर्धक : गीतलेखन, गायन, चाल सबकुछ आर्याच

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. ५ अमरावती**

एका खासगी वाहिनीवरील 'हसल-२' या कार्यक्रमात रॅप प्रकारातील गायनातून आपली स्वतंत्र ओळख निर्माण करणारी अमरावतीकर आर्या जाधव ही आता 'बिग बॉस मराठी'च्या पाचव्या पर्वात स्पर्धक म्हणून सहभागी झाली आहे. आर्या ही येथील उद्योजक हेमंत जाधव यांची कन्या. येथील कॅम्प परिसरात वास्तव्याला असलेल्या आर्या जाधव हिला गायन व गीतलेखनाची आवड आहे.



'बिग बॉस मराठी'च्या पाचव्या पर्वाला रविवारपासून सुरुवात झाली. त्यात ती सहभागी झाली आहे. ती उत्तम परफॉर्मन्सदेखील करीत आहे.

मराठमोळा रितेश देशमुख मराठी बिगबॉसचे सूत्रसंचालन करत असून, आर्यासह अन्य स्पर्धकांनी बिग बॉसच्या घरात प्रवेश घेतला आहे. कोरोना काळात घरी असताना आर्याला एक दिवस रॅप लिहिण्याची कल्पना सुचली. त्यानंतर घराच्या छतावर बसून आर्याने रॅप लिहायला सुरुवात केली. 'हसल-२' या कार्यक्रमात आर्याने १० स्पर्धकांना मागे टाकत उपांत्य फेरी गाठली होती. आर्या जाधवचा 'क्यूके' नावाचा स्वतःचा बँड आहे, जो यू ट्यूबवर खूप धमाल करत आहे. आर्याने 'रॅपर गर्ल' म्हणून ओळख मिळवली आहे. 'कलर्स मराठी'वर आता प्रेक्षकांना रोज रात्री ९ वाजता 'बिग बॉस मराठी' पाहता येणार आहे.

**आर्या आर्किटेक्चर, नव्हे 'क्युके'**

आर्याने येथील होली क्रॉस हायस्कूलमधून दहावी तर गोल्डन किड्समधून बारावी उत्तीर्ण केली. नागपूरला बी. आर्क केल्यानंतर कोरोनाकाळात वर्क फ्रॉम होम सुरू असताना रॅप सिंगिंगमध्ये ती रस घेऊ लागली. त्यातून पुढे मिळालेल्या संधीचे सोने करत ती सोशल मीडियातून, यू ट्यूबच्या माध्यमातून तरुणाईच्या गळ्यातली ताईत बनली. 'क्यूके नावाच्या स्वतःच्या बँडने ती घराघरात पोहोचल्याने तिला मराठी बिग बॉसमधून बोलावणे आल्याचे तिचे वडील तथा ख्यातनाम उद्योजक हेमंत जाधव यांनी सांगितले.आर्याची आई रश्मी या गृहिणी असून, तिचा लहान भाऊ शिवराज हा इंजिनिअर आहे.

# शिरजगाव मोझरी येथील मुख्य रस्त्याचे हाल

## ग्रामस्थांसह विद्यार्थी झाले त्रस्त

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५ शिरजगाव मोझरी**



तिवसा तालुक्यातील शिरजगाव मोझरी येथील मुख्य रस्ता गेल्या कित्येक महिन्यापासून खराब झाला असून नागरिकांचे व विद्यार्थ्यांचे प्रचंड हाल होत आहे ग्रामपंचायत ते शांताई कॉन्व्हेट पर्यंतच्या प्रमुख रस्त्याची ही अवस्था आहे.वास्तविक बारमाही या रस्त्यावर घाणीचे साम्राज्य असते पावसाळ्यात तर त्यामध्ये आणखीनच भर पडते मुख्य म्हणजे प्राथमिक उपकेंद्रामध्ये रोज तपासणी ये जा करणाऱ्या गरोदर महिलांना या प्रमुख रस्त्यावरून जीव मुठीत धरून पायी जावे लागते मात्र या रस्त्यावर अक्षरशः कचराकुंडीचे स्वरूप आले आहे ठीक ठिकाणी पाणी तुंबले आहे तेथील अवस्था पाहता रस्ता अस्तित्वात आहे की नाही असा प्रश्न निर्माण होतो घाण पाणी व त्यात जागोजागी गटार साचलेले अनेकदा वाहने घसरून पडणे कित्येकदा विद्यार्थी शाळेत जाते वेळी पाय घसरून पडले व जखमी झाले असे अनेक प्रकार रोज घडत आहे.ज्येष्ठ नागरिकांना या मुख्य रस्त्यावरून चालणेही कठीण झाले आहेत गेल्या कित्येक महिन्यापासून ही समस्या कायम आहे ग्रामपंचायतला याबाबत वारंवार सांगूनही समस्या सुटलेली नसल्याचे दिसत आहे.




गेल्या काही महिन्या आधी ग्रामपंचायत ने हा मुख्य रस्ता जेसीबीच्या सहाय्याने पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन बदलीसाठी खोदला असल्यामुळे या दोनशे मीटर रस्त्याची ही अवस्था झाली आहे व ग्रामपंचायत मधील सरपंच व सदस्य उडवा उडवी चे उत्तर देऊन नागरिकांना शांत बसवतात. गावातील नागरिकांनी जर नळाचे नवीन कनेक्शन घेते वेळी रोड खोदला तर ग्रामपंचायत त्या नागरिकांकडून हजारो रुपये शक्तीने वसूल करते आणि जर ग्रामपंचायतने खोदलेला मुख्य रोड ग्रामपंचायत का दुरुस्त करत नाही असे गावकऱ्यांचे म्हणणे आहे.

> रोडची मंजुरात सार्वजनिक बांधकाम
>
> 
>
> विभाग मधून झाली असून पावसामुळे व पर्यायी दुसरा मार्ग वाहनांसाठी नसल्यामुळे येत्या १५ ऑगस्ट पर्यंत रोडच्या कामाला सुरुवात होणार आहे.
>
> **निरंजन कडू सरपंच**
> **शिरजगाव मोझरी**

# नुकसान बाधित कुटुंबांना आ.सौ.सुलभाताई खोडके यांच्या हस्ते सानुग्रह अनुदानाचे वाटप

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. ५ अमरावती**

शहरात सुरु असलेल्या संततधार पावसाने अनेक घरांची पडझड झाली, घरात पाणी शिरल्याने अतोनात नुकसान झाले . या नुकसानबाधितांना अमरावतीच्या आ.सौ. सुलभाताई खोडके यांच्या हस्ते सानुग्रह अनुदानाचे वाटप करण्यात आले. यावेळी अमरावती तहसील कार्यालयाच्या वतीने १६० नुकसान बाधितांना प्रत्येकी ५ हजाराचे धनादेश देऊन आधार व दिलासा देण्यात आला.मागील महिन्याभरापासून शहरात संततधार पावसाने कहर केला असून जनजीवन प्रभावित झाले आहे. दरम्यान मंगळवार दिनांक ९ जुलै २०२४ रोजी पहाटेच्या सुमारास झालेल्या पावसामुळे अंबानाल्याला पूर गेला होता. शहरातील हैदरपुरा,जावेद नगर,कबीर नगर,सलाम नगर व सादिया नगर येथील घरांमध्ये झालेल्या पावसामुळे अंबा नाल्याचे पाणी शिरले होते.या पावसाच्या





पाण्यामुळे स्थानिक परिसरातील नागरिकांचे घरातील अन्न-धान्य,कपडे व दैनंदिन जीवनातील वापरावयाचे वस्तूंवर नाल्यातील पाण्यासोबत गाळ येऊन पडला होता. यासोबतच घरात गाळ साचल्याने जीवनावश्यक वस्तूंचे नुकसान झाले होते. त्यामुळे ही बाब लक्षात घेता, स्थानिक प्रशासनाने पाहणी केली.तदनंतर संबंधित आवश्यक प्रक्रियेची प्रशासनाच्या वतीने कार्यवाही करण्यात आली. अशातच शुक्रवारी दिनांक २ ऑगस्ट २०२४ रोजी आमदार-सौ.सुलभाताई खोडके यांच्या हस्ते सानुग्रह अनुदानाचे धनादेशाचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी १६० नुकसान बाधितांना सानुग्रह अनुदान असलेल्या रुपये पाच हजार च्या धनादेशांचे वितरण करण्यात आले. कुठलीही नैसर्गिक आपत्ती आपत्ती ही एक आकस्मिक घटना असते. यामध्ये दुर्दैवाने झालेली जीवित अथवा वित्त हानी ही परिवारावर आलेलं फार मोठं संकट असते. अशा परिस्थितीत पीडित परिवाराला आधार मिळावा म्हणून शासनाच्या वतीने सानुग्रह अनुदान दिले जाते. यातून परिवाराची विस्कटलेली स्थिती पूर्वपदावर येण्यास हातभार लागत असून अशा कठीण काळात आपण नुकसानबाधित परिवाराच्या सोबत असल्याचा विश्वास आमदार महोदयांच्या वतीने व्यक्त करण्यात आला.यावेळी आमदार-सौ.सुलभाताई खोडके यांच्या समवेत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष-संजय खोडके, यश खोडके, अमरावती तहसीलदार-विजय लोखंडे,तलाठी-आर.यु. झंगळे आदींसह नुकसान बाधित कुटुंबातील सदस्य तसेच स्थानिक नागरिक प्रामुख्याने उपस्थित होते.